# श्री साईलीला

श्रीसाईबाबा संस्थान, शिरडीचे अधिकृत मासिक




द्वारकामाईतील श्रीसाईबाबा

श्री साईनाथ वाचनाल
श्री साईबाबा संस्थान, शि

जगा लावावे सत्पथी । हेचि साईलीलेची कृती ॥

२०८

श्री

# साईलीला

श्रीसाईबाबा संस्थान,
शिरडीचे अधिकृत मासिक


: संपादक :

**श्री.क.हि.काकरे**

रिसिव्हर श्रीसाईबाबा संस्थान, शिर्डी

: कार्यकारी संपादक :

डॉ.श्री.दि.परचुरे
एम. ए. पी. एच. डी.
( इंग्रजी आवृत्ती )

श्री.सदानंद चेंदवणकर
( मराठी आवृत्ती )


## श्रीसाईवाक्सुधा


वर्ष ६१ वे ) किंमत १ रुपया ( अंक ४

जुलै १९८२


खास गुरुपौर्णिमा विशेषांक


: कार्यालय :

"साईनिकेतन", प्लॉट नं. ८०४-बी, डॉ. आंबेडकर पथ, दादर, मुंबई-४०० ०१४.

दूरध्वनी : ४४३२६१

वार्षिक वर्गणी रु. १०/- (ट.ख.सह) किरकोळ अंक १ रु. फक्त.



## श्रीसाई वाक्सुधा

संत आरंभी उग्र भासती ।
तरी त्यांपोटीं लाभेंवीण प्रीति ।
अल्पधीर पाहिजे चित्तीं ।
करितील अंतीं कल्याण ॥ ४५ ॥

शापताप–संसृति माया ।
सत्संगाची पडतां छाया ।
ठायींचे ठायींच जातील विलया ।
म्हणोनि त्या पायां विनटावें ॥ ४६ ॥

सविनय आणि अनुद्धत ।
होऊनि संतां शरणागत ।
प्रार्थावें त्यां निजगुजहित ।
देतील चित्त-स्वास्थ्यातें ॥ ४७ ॥

अल्पज्ञानाचिया अभिमानीं ।
संतवचनीं विकल्प मानी ।
होते त्या आधीं कैसी हानी ।
विश्वासें निदानीं कल्याण ॥ ४८ ॥

शुद्धमनें वा कपटें सर्वथा ।
खऱ्या संतांचे चरण धरितां ।
अंती पावे तो निर्मुक्तता ।
अगाध योग्यता संतांची ॥ ४९ ॥

—श्रीसाई सच्चरित अध्याय ४८ वा.

**ओम् नमोस्तुते व्यास विशाल बुद्धे ।**
**फुल्लार विंदायत पत्रनेत्र ।**
**येन त्वया भारत तैल पूर्णः ।**
**प्रज्वालितो ज्ञानमयः प्रदीपः ॥**

फुललेल्या कमळासारखे ज्यांचे आकर्ष नेत्र आहेत, ज्यांची बुद्धि विशाल आहे, अशा हे व्यासमुने, ज्या तुम्ही भारत रूपी तेलाने भरलेला ज्ञानदीप प्रज्वलीत केलात त्या तुम्हाला नमस्कार असो—

# शरण जाऊ सद्गुरुशी




सद्गुरु वाचोनि सापडेना सोय ! धरावे ते पाय आधी त्याचे असे आपल्या शास्त्रात म्हटले आहे. मानवी जीवनात जन्मापासून माणसाला पुढे जाण्यासाठी गुरुची साथ लागते. माता, पिता, शिक्षक सगळे गुरुची लहान-मोठी भूमिका बजावतात. परंतु या गुरुच्या गुरुपदाला मर्यादा असतात. मनुष्यजन्म सर्वार्थाने सच्छल बनवायचा असेल तर त्यासाठी श्रेष्ठ गुरु लागतो. ब्रह्मा विष्णू महेश यांच्या अंशानी त्रिमूर्ती बनले. श्री दत्तात्रय हे गुरुरूप म्हणून सर्वमान्य व सर्वश्रेष्ठ होत. त्यांनी जसे मानव उद्धाराचे काम केले तसेच कार्य सामान्य माणसाच्या जीवनात गुरु करीत असतो. गुरुची आवश्यकता कुणाला नाही ? गुरुवाचून मानवाचा उद्धार नाही, ज्ञानेश्वरासारख्या संतश्रेष्ठासही गुरु महात्म्य पटले व ते त्यांनी वर्णिले. ज्ञानेश्वर म्हणतात, तैसे श्रीगुरुचे महिमान, आकळिले असे साधन, हे जाणोनि मियां नमनः, निवांत केले। अंतर व बाह्य भावाने गुरुसेवा कशी करावी याचा सर्वोच्च आदर्श ज्ञानदेवानी आपल्यापुढे ठेवला आहे, इतरही सर्व संत–महात्म्यांनी आपल्या रसाळ वाणीत गुरुमहात्म्य सांगितले आहे.

मानवी जीवन हे अनेक प्रश्नचिन्हांनी व समस्यांनी भरलेले आहे. या समस्यांचे निराकरण मानवी शक्तीच्या पलिकडे आहे. प्रत्येक समस्येचे निराकरण इच्छेनुसार होईलच असेही नाही. पण त्यासाठी लागणारे बळ गुरुभक्तीतूनच मिळू शकते. मनात श्रद्धा जागविली, त्या श्रद्धेतून पवित्र भावे गुरुभक्ती केली तर भक्ताचे जीवन सुकर व सुसह्य झाल्याशिवाय रहाणार नाही. सद्गुरुशी एकरुपत्व साधणारा भक्त हा भक्त किंवा शिष्य न रहाता स्वतःच स्वामी बनतो आणि मग त्याला आपोआप जीवनात यशस्वी वाटचाल करण्यास लागणारा प्रकाश सापडतो. आज बहुतेकांची अवस्था भरकटल्यासारखी झाली आहे याचे कारण गुरुभक्तीचा अभाव. गुरु महात्म्य व गुरुभक्तीचे श्रेष्ठत्व सांगणाऱ्या गुरुपौर्णिमेनिमित्त प्रत्येक भाविकाने, भक्ताने आपल्या हृदयात गुरुप्रेम व गुरुभक्ती जागविली तर पौर्णिमेच्या चंद्राप्रमाणे स्वच्छ प्रकाश त्याला जीवनात दिसल्याशिवाय रहाणार नाही. म्हणूनच गुरुः साक्षात् परब्रह्म मानू सद्गुरुंना शरण जाऊ या !

# अनुक्रमणिका जुलै १९८२

207


| | |
|---|---|
| १) संपादकीय | — शरण जाऊ सद्‌गुरुशी |
| २) राष्ट्रपतींची शिरडी भेट | — |
| ३) श्री नामदेव महाराज पुण्यतिथी | — साईनंद |
| ४) मत्स्यारूढ भगवान श्री झुलेलाल | — |
| ५) पंढरी नगरी | — |
| ६) जीवनात सद्‌गुरु महत्वाचा | — |
| ७) ज्ञानदेवांची गुरुभक्ती | — |
| ८) एकादशीचे महत्व | — |
| ९) साईभक्ती कशी करावी | — श्री. पां. वा. भुतकर |
| १०) असा हा पौर्णिमांचा महिमा | — |
| ११) योग्य जोड्या लावा | — श्री. माधव गोरे |
| १२) आम्हाला बाबांचाच आधार | — डॉ. इंदूताई नाईक |
| १३) श्री गजाननबाबा व श्रीसाईबाबा एकच | — श्री. लक्ष्मण रापतवार |
| १४) श्रीसाईबाबा दत्तावतारच | — श्री. रामचंद्र खेले |
| १५) श्रीबाबा व नाना चांदोरकर | — सौ. उषा अधिकारी |
| १६) श्रीबाबांवरची नियतकालीके | — |
| १७) मृत वानरी जिवंत झाली | — प्रा. एच. बी. महाले |
| १८) श्रीसाईकृपा | — सौ. विनिता केंकरे |
| १९) सोळा अवतारी श्री गुरुदत्तात्रेय | — गौसराम उरणकर |
| २०) भारतातील श्रीसाईबाबांची मंदिरे | — |
| २१) श्री गुरुपुजा | — डॉ. सुमती खानविलकर |
| २२) श्री गुरुदक्षिणा | — सौ. शांता सरोदे |
| २३) श्रीगुरु गीत | — श्रीमती श्री शहाणे |
| २४) गुरुपौर्णिमा | — सौ. शशिकला रेवणकर |
| २५) बडी दयालू मशिदमाई | — श्री. जयवंत कुलकर्णी |
| २६) साई | — सौ. वंदना लाळगे |
| २७) एक पथिक | — अनामिका |
| २८) प्रार्थना | — श्री. मुरलीधर घोलप |
| २९) साईस्तवन | — श्री. चंद्रकांत नाचणे |
| ३०) साई शिरडी जाऊया | — श्री. ग. शां. बडगुजर |
| ३१) शिरडी हा स्वर्गच | — श्री. म. कृ. विचारे |
| ३२) तुझी प्रार्थना माझी पुण्य कमाई | — श्री. दत्ता कदम |
| ३३) शिरडी वृत्त | — |

208

# साप ! साप ! श्रीसाईबाबा प्रसन्न

## संपादकीया बद्दल भक्तांची प्रतिक्रीया

संपादक 'श्रीसाईलीला'

यांस—स. न. वि. वि.

जूनचा 'श्रीसाईलीला' अंक वाचला आणि मनाचे समाधान झाले. दि. २३-४-८२ च्या दैनिक 'नवशक्ती' मध्ये प्रसिद्ध झालेल्या 'शिर्डी टुरिस्ट सेंटर नव्हे' ह्या अग्रलेखाबद्दल मा. कोर्ट रिसिव्हर श्री. काकरेसाहेब यांनी जो खुलासा जूनच्या 'श्रीसाईलीला' मासिकात प्रसिद्ध केला आहे तो वाचून मनस्वी आनंद झाला त्याबद्दल श्री. काकरेसाहेबांचे अभिनंदन !

दै. 'नवशक्ति' मध्ये तो लेख प्रसिद्ध झाल्यापासून सर्व साईभक्तांत खूप खळबळ माजली होती. आम्हीही ती बातमी ऐकून व वाचून आश्चर्यचकित तर झालोच परंतु अतिव दुःखही झाले. काही जबाबदार व्यक्तीकडून आम्हाला ती बातमी कळली व तो लेख वाचल्यामुळेच आम्ही आमच्या गिरगावच्या श्री साईनाथ मित्र मंडळातर्फे त्याचा निषेध व विरोध दर्शविण्यासाठी साईभक्तांच्या जवळ जवळ १५०० सह्या गोळा केल्या आहेत. आम्ही शिर्डी संस्थानकडून येणाऱ्या खुलाशाची वाट पाहात होतो. परंतु आपण केलेल्या खुलाशामुळे त्या बातमीला काहीच तथ्य न राहिल्यामुळे आता विरोध करण्याचा प्रश्नच उद्भवत नाही. श्री. काकरे साहेबांनी केलेल्या खुलाशाने आम्हा सर्व साईभक्तांना अत्यानंद होणे स्वाभाविकच आहे. ते स्वतः साईभक्त असल्यामुळे दिक्षितवाड्यासारखी ऐतिहासिक वास्तू पाडून तेथे पंचतारांकित हॉटेल बांधून साईभक्तांची मने ते निश्चितच दुखवणार नाहीत हे मनाला पटत होते. परंतु काही मतलबी व राजकारणी घेडांनी आपले स्वतःचे राजकारण साधण्यासाठी हा जो खेळ केला त्यावर आम्ही विश्वास ठेवून आपल्या विरोधात उभे ठाकलो याचा आम्हाला फार मनःस्ताप तर झालाच परंतु आम्ही आमच्या ह्या झालेल्या चुकीबद्दल श्री साईबाबांजवळ क्षमाही मागत आहोत.

त्यात आम्हाला यत्किंचितही लाज वाटत नाही कारण शेवटी आपण सर्व साईभक्तच आहोत.

वास्तविक 'दै. नवशक्ती'चे संपादक श्री. पु. रा. बेहेरे यांनी स्वतः शिर्डी संस्थानकडे याची चौकशी करून सत्यघटना काय आहे ते समजावून घेऊन मगच अग्रलेख खरडला असता तर बरे झाले असते. परंतु स्वतःच्या वर्तमानपत्राचा खप वाढविण्यासाठी त्यांनी साईभक्तांशी असा खेळ करावयास नको होता. कारण आज आमच्यासारख्या असंख्य तरुण साईभक्तांनी प्रत्यक्ष श्रीसाईबाबांना पाहिले नसल्यामुळे

श्रीसाईबाबांच्या स्पर्शाने ज्या वस्तू अगर वास्तू पावन झालेल्या आहेत त्यांचे नुसते दर्शन जरी घेतले तरी आमच्या मनाला फार समाधान मिळते.

परत एकदा श्री. काकरेसाहेबांचे अभिनंदन करतो व आपणास असे आश्वासन देतो की यास्तव आपल्या विरुद्ध खोटा प्रचार केल्यास आम्ही सर्व साईभक्त व आमचे श्री साईनाथ मित्र मंडळ आपल्या पाठीशी उभे राहून त्याचा प्रतिकार केल्याशिवाय राहणार नाही हे निश्चित. कारण दुसरी काही लंगोटी पत्रे आता अपप्रचार करण्यास पुढे सरसावली आहेत.

कळावे. आपला

**अनिल नारायण रिसबुड**
गिरगाव–मुंबई नं. ४

## साईभक्त मंडळाचे संमेलन

● साई भक्त मंडळ, दादर मुंबई या संस्थेतर्फे साई भक्तांचे संमेलन शनि. ता. १२ व रवि. ता. १३ जून ८२ हे दोन दिवस दादर येथील हिंदुकॉलनी तील राजा शिवाजी विद्यालयातील बेसमेंट हॉलमध्ये साजरे करण्यात आले.

शनि. ता. १२ रोजी सायं. ६–३० वा. श्रीबाबांच्या पादुका व तसबिरीची मिरवणूक साईनिकेतन येथून निघून ती संमेलनस्थानी आली. रवि. ता. १३ रोजी सकाळी ६ पासून तो रात्री १०–३० पर्यंत भरगच्च कार्यक्रम झाले. काकडआरती सनईवादन, लघुरुद्र पुजा, खुले अधिवेशन, माध्यान्ह आरती, प्रसाद, भोजन मानसरोवर व कैलास दर्शन स्लाईडस शो, कुर्ल्याच्या रंजना कला मंडळातील महिलांचे भजन, धुपारती काही गायकांचे भक्ती संगीतांचे कार्यक्रम व ह्या नंतर शेजारती असे कार्यक्रम झाले.

या संमेलनाचे नियोजित प्रमुख पाहुणे श्री. पु. रा. बेहेरे हे शेवटपर्यंत आलेच नाहीत, तर दुसरे पाहुणे श्री. बाबासाहेब लिमये हे धुपारती नंतर येऊन काही वेळातच परतले.

# राष्ट्रपतींची शिरडीला भेट



● राष्ट्रपती श्री. नीलम संजीव रेड्डी यांनी मंगळवार ता. १५ जून १९८२ रोजी शिरडी येथे भेट देऊन श्रीसाईबाबांच्या समाधीचे दर्शन घेतले आणि बाबांची विधी-पूर्वक पूजा करून मनोभावे त्यांचे कडून आशीर्वाद मागितले. राष्ट्रपतींच्या बरोबर महाराष्ट्र राज्याचे राज्यपाल श्री. आय. एच. लतीफ आणि राज्यशिष्टाचार व उर्जा मंत्री प्रा. एस. एम. आय अमीर हे पण होते.

या दिवशी सकाळी १० वाजता असनगाव येथील हेलीपॅडवर हेलीकॉप्टरने राष्ट्रपतींचे आगमन झाले व तेथून मोटारने ते शिरडी येथे आले. राष्ट्रपतींनी पांढरे शुभ्र धोतर, पांढरा अंगरखा व पांढरी टोपी असावेत परिधान केला होता. श्रीसाईबाबा संस्थानचे कोर्टरिसिव्हर साहेब श्री. क. हि. काकरे, ऑफीस सुपरिटेंडेंट श्री. द. चिं. पाठक साहेब आणि असंख्य लोकांनी त्यांचे उत्स्फूर्त स्वागत केले.

शिरडीस आल्यावर श्री. रेड्डी यांनी बाबांची रितसर पूजा केली व बाबांच्या पुतळ्याला मनोभावे हार घातला. पूजा अर्चे नंतर श्री. रेड्डी यांचा सत्कार करण्यात आला. संस्थानच्या वतीने राष्ट्रपतींना शाल, श्रीफल व बाबांची चांदीची मूर्ती अर्पण करण्यात आली. राज्यपाल श्री. लतीफ व मंत्री श्री. असीर यांनीही बाबांची पूजा केली. संस्थानतर्फे त्यांचाही शाल व श्रीफल देऊन सत्कार करण्यात आला. साई दर्शना नंतर राष्ट्रपती प्रसन्नचित्त दिसत होते. देशात सुख शांती आणि समृद्धी नांदावी व देशाचे ऐक्य कायम रहावे अशी प्रार्थना त्यांनी बाबांपाशी केली.

संध्याकाळी परत जाताना पुन्हा मंदिरात जाऊन त्यांनी बाबांचे दर्शन घेतले; आणि तिथे बसलेल्या साईभक्तांशीही गप्पा गोष्टी केल्या. बाबांची अशीच सेवा करा. सेवेसाठी हे वातावरण चांगले आहे असे ते भक्ताना म्हणाले.

साईदर्शनाने समाधान पावलेले राष्ट्रपती सायंकाळी हेलीकॉप्टरने औरंगाबादला रवाना झाले.

❀ मत्स्यारूढ भगवान झुलेलाल ❀



विशेष लेख पान क्रमांक १२ पहा.

# संत श्रीनामदवे महाराज पुण्यतिथि

● महाराष्ट्र ही संतांची भूमी या भूमीत ज्ञानदेव, तुकाराम, रामदास, चोखामेळा, जनाबाई इ. अनेक संत होऊन गेले. प्रत्येक संताचे आपल्या संस्कृतीत, समाजात एक विशिष्ट स्थान आहे. परंतु संत नामदेवांचे स्थान या सर्व संतापेक्षा फार वेगळे आणि म्हणूनच अधिक महत्वाचे आहे. सर्व संतांप्रमाणे त्यांनीही भक्ती मार्गाचा भागवत धर्माचा प्रसार-प्रचार केला. परंतु नामदेवांनी हे कार्य महाराष्ट्रातच नव्हे तर महाराष्ट्रा बाहेर राजस्थान, पंजाब, हरियाणा, हिमाचल प्रदेश या सारख्या दूरच्या प्रदेशात केले, व ते पण आजपासून सुमारे पाचशे पेक्षा अधिक वर्षा पूर्वी ! परस्पर सान्निध्याची किंवा वाहतूकीची साधने जेव्हा नव्हती, भाषा परकी होती, अशी सर्व प्रतिकूल परिस्थिती असताना नामदेवांनी आपल्या पंथाचा प्रचार या दूरवरच्या भागात केला. इतकेच नव्हे तर तो इतका प्रभावशाली ठरला की आजही नामदेवांची कीर्तीपताका या प्रदेशात उंच फडकत राहिली आहे हे या नामदेव महाराजांचे खरे वैशिष्ट्य होय.

पंढरीच्या भक्तिमार्गाची लाट पंजाबपर्यंत पोहोचवून भागवत धर्मासाठी मुलुख-गिरी करणाऱ्या संत श्रीनामदेव महाराज यांची पुण्यतिथी आषाढ कृष्ण १३ या दिवशी येते.

मराठवाड्याच्या परभणी जिह्यात परशीब्राह्मणी नावाचे खेडे आहे. हे नामदेव महाराजांच्या पूर्वजांचे मूळ गाव होय. यदूशेट हे शिंपी जातीतील होते. त्यांच्यापासून पाचवा पुरुष दामूशेट. यांच्या घराण्यात पंढरपूर येथे नामदेवरायांचा जन्म कार्तिक शु. ११ इ. स. १२७० रोजी झाला. नामदेव लहानपणीच विठ्ठल विठ्ठल म्हणू लागले. पाटीवर लिहू लागले. सवंगड्याना शिकवू लागले. ते एकदा नैवेद्य घेऊन विठ्ठलमंदि-रात गेले. त्यांच्या बालमनाला वाटले की, देव दररोज नैवेद्य खात असावा. तो आजच का रुसला ! त्याने हट्ट धरला. शेवटी बाल-भक्ताचा हट्ट पाहून विठ्ठलाने नैवेद्य खाल्ला. आईवडिलांना आश्चर्य वाटले. आपला मुलगा विठ्ठलभक्त झालेला पाहून दामूशेटलाहि खूप आनंद झाला.

नामदेव मोठा झाल्यावर राजाई नावाच्या मुलीशी त्याचे लग्न झाले; पण धंद्या-कडे त्याचे लक्ष विठ्ठलभक्तीच्या नादामुळे लागेना.

ज्ञानेश्वरांची ज्ञानेश्वरी इ. स. १२९० मध्ये लिहून झाली होती. ज्ञानदेव आता पंढरीस येऊ लागले. ज्ञानेश्वरांचे प्रवचन व नामदेवांचे कीर्तन पंढरीत चाले. भक्त

सावता माळी, संत चोखा मेळा, गोरा कुंभार यांच्या भेटी पंढरपुरी नेहमी पडू लागल्या. कथा हेच जीवन, कीर्तन हाच व्यापार, नामस्मरण हेच काम आणि विठ्ठल-भक्ती हाच नामदेवांचा व्यवहार झाला.

प्रत्यक्ष पांडुरंगाची आज्ञा ऐकून नामदेवरायांनी विसोबा खेचर यांना गुरु करून घेतले. त्यामुळे अहंकार नाहीसा होऊन लीनता आली.

नामदेवांनी स्वतःच्या अभंगांची कीर्तने करून भागवत धर्माचा प्रसार केला. नामदेवराय हे वारकरी संप्रदायाचे आद्य कीर्तनकार होत. भागवत धर्म प्रचारासाठी सन १३२० मध्ये ते पंजाबपर्यंत गेले. वीस वर्षे त्यांनी उत्तरेतहि भक्तिमार्गाचा प्रचार केला आणि भागवत धर्माचा झेंडा उभारून मुसलमानी धर्माच्या आक्रमणास विरोध केला. हिंदी भाषेत कवने केली व पंजाबपर्यंत विठ्ठलभक्ती पोहोचविली. शिखांच्या ग्रंथसाहेबातहि त्यांची कवने आढळतात. अशी ६१ पदे त्या ग्रंथात आहेत, त्यांना 'नामदेवजीकी मुखबानी' म्हणतात. पंजाबात घोमान गावी नामदेवाचे स्मारकमंदिर बांधले आहे. आजहि पंजाबात त्यांचे हजारो अनुयायी आहेत. नामदेवांनी येथे ५–७ वर्षे वास्तव्य केले.

याशिवाय हरियानात, भिवानी, राजस्थानमध्ये जयपूर येथे, उत्तर प्रदेशात कापूरगड, भगवानपूर येथे व अन्यत्र नामदेवांची मंदिरे आहेत. काहींच्या मते तर नामदेव थेट काबूलपर्यंत गेले होते परंतु पंजाब वर त्यांचा विशेष प्रभाव पडला. पंजाब भर त्यांचे लक्षावधी भक्तगण विखुरले गेलेले आहेत. नामदेव हे पंजाबी लोकांचे परम श्रद्धास्थान बनले आहे. नामदेव व नारायण एकच अशा भक्तीभावाने पंजाब-मधील शीख बंधू नामदेवाकडे पहातात. पूर्वीच्या पंजाब राज्यात व आसपासच्या प्रदेशात मिळून नामदेव रायांची सुमारे दोनशे मंदिरे होती. पैकी बहारपूर येथील प्रसिद्ध मंदिर पाकीस्तानात आहे.

पंजाबमधील समाजाला, जनसामान्याला त्यांनी भक्ती मार्गाची गोडी लावली. आपल्या अभंगानी त्यांना मुग्ध केले. हे अभंग त्यांनी हिंदी भाषेतून लिहिले हे विशेष आश्चर्य होय. मराठीत तर नामदेवांच्या काव्याला अमरस्थान आहे—

सिंधुहूनी सखोल सुरस तुझे बोल
आनंदची बोल नित्य नवी
परि नामयाचे बोलणे नव्हे हे कवित्व
हा रस अद्‌भुत निरोपमु

असे नामदेवांनीच म्हटले आहे.

नामदेवांची हिंदी पदरचना देखील तितकीच साधी व मधुर आहे. त्यांच्या हिंदीवर मराठीचा ठसा उमटलेला आहे. त्यांच्या हिंदी अभंगात जाडजूड शब्द नव्हते की अवाढव्य कल्पना विलास नव्हता. साध्या दैनंदिन जीवनातील उदाहरणे देऊन आपल्याला येतील ते हिंदी, न येतील तिथे मराठी शब्द ठेऊन त्यांनी पद्य रचना करुनही तिने हिंदी भाषिक बांधवांना भुरळ पाडली. सुप्रसिद्ध संत कबीर यांच्या रसाळ पद्या इतकेच नामदेवांच्या अभंगाना हिंदी साहित्यात स्थान आहे. त्यांच्या अशा पद्य रचनेचे उदाहरण असे—

यह संसार हाटकी रेखा
सब कोड बरजही आया।
जिन जस लादा तिन तस पाया
मुरख भूत गँवाया॥

नामदेव शिंपी असल्या कारणाने शिंपी कामासंबंधीची साधी उदाहरणेही त्यांनी आपल्या काव्यात गुंफली आहेत. ते म्हणतात.

सुईनेकी सुई, रुपे का धागा।
नामका चितु हरिसड सागा॥

जातपात उच्चनीच हा भेदभाव नामदेवांना मुळीच मान्य नव्हता. देवाच्या दृष्टीने सर्व सारखे आहेत हाच मंत्र त्यांनी लोकांना दिला. जाती भेद कसा पोकळ आहे हे दाखविणाऱ्या त्यांच्या पुढील दोन ओळी पहा—

कहा करड जाती कहा करड पाती
रामको नाम जपड दिन राती

वरील काव्य पंक्तीत सुईना, जपड हे काही तसे शुद्ध शब्द नव्हेत परंतु ते मनापासून आलेले आहेत आणि शुद्ध शब्दापेक्षा त्यांच्यात अधिक गोडी आहे.

हा हिंदू हा मुसलमान हा भेद देखील नामदेव महाराजांना मान्य नव्हता. हिंदु देवळात जातात तर मुसलमान मशिदीत. पण खरा परमेश्वर आपल्या हृदयात आहे असे त्यांचे मत होते.

हिंदु पूजै देहूरा मुसलमान मसीत
नामा सोई सेविया जहै देहुरा न मसीत

प्रभूच्या दर्शनासाठी आतुरल्या नामदेवांनी म्हटले आहे की—

मुझे लगती माला वेली लागी
बछरा बिनु गाई अकेली ।

गाईविना वासरू व्याकुळ व्हावे तसा मी प्रभुशिवाय व्याकुळ आहे.

गुजराथमध्येही नामदेवांनी आपल्या पंथाचा प्रचार केला होता, प्रवास केला होता.

नामदेवांच्या भाषेत व्रज, मराठी, हिंदी, गुजराथी इ. शब्दांचा समावेश असूनही हिंदी साहित्यात त्यांच्या काव्याला अमर स्थान प्राप्त झाले आहे. तलवारीच्या जोरावर अटकेपार झेंडा लावणाऱ्या राघोबाच्या मर्दूमकीचा आपला इतिहास गौरवाने उल्लेख करतो ते योग्यच आहे परंतु प्रेम, श्रद्धा व भक्तीची पताका नामदेवांनी अटकेपार लावली ती आजही फडकत आहे. आपल्या देशाला हीच पताका खरा मार्ग दाखवणारी आहे.

६०० वर्षांपूर्वीच्या या संताचे महाराष्ट्रापासून पंजाबपर्यंत पसरलेले कार्य मोठेच सांस्कृतिक ठरले, यास शंका नाही. ज्ञानेश्वरानी रचलेला भागवतधर्ममंदिराचा पाया बळकट करून त्याचा विस्तार करण्याची जबाबदारी नामदेवरायानी पार पाडली. पंजाबातहि त्यांची शेकडो मंदिरे आहेत.

आयुष्याचे शेवटचे दिवस पांडुरंगाच्या पायाजवळ घालवावे व लवकरच अवतार संपवावा, असा विचार नामदेवांच्या मनात आला. तो त्यांनी इतरांना सांगितला. ३ जुलै १३५० आषाढ वद्य १३ या दिवशी पांडुरंगाच्या महाद्वारात नामदेवानी निर्विकल्प समाधी घेतली. नामदेवपायरी म्हणून ही जागा प्रसिद्ध आहे. आजहि तेथे लोक भक्तिभावाने वंदन करतात. —साईनंद

★

2-12

# मत्स्यारूढ भगवान झूलेलाल

**लाला साई झुले। झुलेलाल झूले ॥**

ख्यातनाम उर्दू कवि इकबालने सांगायचे म्हणून सांगून टाकले की—

'मजहब नहीं सिखाता आपस में बैर करना हिंदी है हम, वतन है, हिन्दोस्ताँ हमारा.'

(धर्म परस्परात बैर करायला शिकवीत नाही. आम्ही सारे हिंदी आहोत हिंदुस्थान हा आमचा देश आहे.)

पण जीवनातील कठोर वास्तवता ही आहे की—अत्याचार, धाक, प्रलोभन, फसविणे इत्यादि वेगवेगळया माध्यमाच्या आधारे या ना त्या प्रकारे दुसऱ्याचे धर्मांतर करून आपल्या तथाकथित पंथाच्या गटात ओढून त्यांना मुसल्मान किंवा ख्रिश्चन करायचे हे हेमेटिक व सेमेटिक पंथांच्या अनुयायांच्या जीवनाचे अंतिम उद्दिष्ट राहिले आहे. इतिहास साक्षी आहे की गेली हजार वर्षे आम्ही हिंदू या विदेशी संस्कृतीच्या विधर्मीयांच्या अमानुष अत्याचारांचे क्रूर छळाचे शिकार होत आलो आहोत. तरी सुद्धा याच इकबाल कवीच्या शब्दात—

'कुछ बात है ऐसी कि हस्ती मिटती नहीं हमारी, यों सदियों रहा है दुष्मन, दौरे जमा हमारा.'

(शतकानुशतके सारे जग आमचे शत्रू असूनसुद्धा आमचे अस्तित्व मात्र नष्ट झालेले नाही. ही आमच्यातील एक आगळीच विशेषता आहे.)

आठव्या शतकाच्या प्रारंभीच्या वर्षात बगदादच्या खलीपाच्या आज्ञेवरून अबुबिन कासीमच्या नेतृत्वात मुसल्मानानी भारतावरील पहिले आक्रमण सिंधु देशावर (सिंध प्रांत) केले. अनेक कारणामुळे सिंधुपती सम्राट दाहीर युद्धात पराभूत झाला व रणांगणावरच त्याला वीर मरण प्राप्त झाले.

परंतु राष्ट्रीय रूपाने जाग्रत व सुसंघटित सिंधी वीरांनी केवळ बारा वर्षाच्या स्वल्पशा अवधीत महर्षी देवलांच्या मार्गदर्शनात आपल्या शूर योद्धांच्या बळावर तसेच आपल्या राजवंशाशी संबंधित अन्य राज्यांच्या सैनिकी—साहाय्याने आततायी विधर्मी

खलीपाच्या आक्रमणास उपटून टाकले, आणि बळजबरीने मुसलमान बनविण्यात आलेल्या आपल्या असंख्य बंधु-भगिनींना सन्मानपूर्वक त्यांच्या मूळ हिंदु धर्मात सामावून घेतले.

पवित्र वेदभूमी असलेल्या सिंधुदेशाची ही गौरवशाली स्थिती सुमारे दोन शतके अशीच अबाधित राहिली. पण तदनंतर मात्र पुन्हा क्रूर यवन शक्तींनी आमची ही पूण्यभूमि व येथील रहिवासी दोघानाही आपल्या दास्यतेच्या शृंखलानी जखडून टाकले. तत्कालीन सुलतानाची राजधानी कराची जिल्ह्यातील ठठ्ठा या गावी होती. त्या सुलतानाने आणि त्याच्या मुल्ला-मौलवींनी तसेच सत्ता हाती असलेल्या सर्व लहान मोठ्या अधिकाऱ्यांनी सिंधुदेशातील हिंदु प्रजेचा धर्मांतरित करण्याकरिता अनन्वित छळ केला, आणि शेवटी तर हिंदु प्रजेकरिता सुलतानाच्या आज्ञेवरून दवंडी पिटविण्यात आली की एका निश्चित दिवसापूर्वी सर्व हिंदूंनी मुसलमान धर्माचा स्वीकार करावा. जो कोणी ही आज्ञा पाळणार नाही त्याचा शिरच्छेद करण्यात येईल.

दुःखी आणि भयत्रस्त हिंदू महानदी सिंधुच्या तीरावर जमले व वरूण देवाची आराधना-उपासना करू लागले. त्या सगळ्यांनी दीनपणे एकच प्रार्थना केली 'या आततायी आक्रमकांपासून आमच्या प्राचीन हिंदू धर्माचे रक्षण कर, आणि या संकटातून आमचे संरक्षण कर.' अनेक दिवस भुकेले-तान्हेलेले राहून एकाग्रतेने त्यांनी तपश्चर्या केली. त्या सर्वांच्या हृदयातील खऱ्या आणि आर्त धाव्याने द्रवित होऊन वरूणदेवाने श्री झूलेलालच्या रूपाने अवतार घेतला. साई झूलेलालने आपल्या अलौकिक लीलांनी दुष्टांचे दमन केले. मदांध आणि धर्मांध अधिकाऱ्यांच्या दुष्ट हृदयाचे परिवर्तन केले, आणि सर्व प्रकारे हिंदूना निर्भय करीत त्यांचे रक्षण केले. अनादि कालापासून चालत आलेल्या सनातन वैदिक हिंदू धर्म अशाप्रकारे पुन्हा प्रस्थापित केला.

येथे हे लक्षात ठेवण्यासारखे आहे की आक्रमक मुसलमानांपासून हिंदूंना मुक्त करणाऱ्या भगवान झूलेलाल यांचा लीला-काल महाराणा प्रताप, गुरूगोविंद सिंह व छत्रपति शिवाजी महाराज यांच्यापेक्षा शेकडों वर्षापूर्वीचा होता.

तेव्हांपासून आजवर कृतज्ञ सिंधी हिंदूंनी भगवान झूलेलाल यांची ठिकठिकाणी असंख्य मंदिरे बांधली. या देवळात त्यांची पूजा-अर्चा नियमितपणे होत असते, व प्रलयकालपर्यंत भगवान झूलेलालचे नामस्मरण-कीर्तन-पूजन मोठ्या प्रमाणावर होत राहील. यात शंका नाही.

वरूण देव वैदिक देवता असून त्याचे वाहन मत्स्य आहे व हातात पवित्र वेदग्रंथ सदैव असतो.

सिंधी समाजात संकटाच्या वा दुःखाच्या कुठल्याही प्रसंगी आजही त्यांच्यातील संत–महात्मे किंवा घरातील मोठी माणसे संकट ग्रस्तांना खालील शब्दांत सांत्वना देतात–" पिआरा चऔ झूलेलाल, त थीन्दो बेडोई पार " ( बाळा, झूलेलालचा जप कर म्हणजे सर्व संकटांना तरून जाशील. )

१९४७ मध्ये दुर्दैवाने पुन्हा एकदा वाईट दिवस आले. जनतेच्या प्राणांहूनही प्रिय असलेल्या भारतमातेच्या विभाजनामुळे धर्म, लोकांचे प्राण, संपत्ती फार काय आपल्या आई बहिणी यांना मुसलमानांचा फार मोठा धोका उत्पन्न झाल्याने लक्षावधी विवश व असहाय्य हिंदूना आपली मातृभूमि–पवित्र सिंधु भूमि नेहमी करिता सोडावी लागली व भारताच्या वेगवेगळया भागात स्वतःला विखरून घ्यावे लागले. सृष्टीच्या प्रारंभापासून परमपवित्र सिंधूचा जो तट तपःपुनीत व केवळ वाऱ्यावर निर्वाह करणाऱ्या ऋषिमुनींच्या अपौरुषेय वेदगानाने निनादत असे आणि ज्या तटावर केवळ विश्वकल्याणाच्या ' कृण्वन्तो विश्वमार्यम् 'च्या भावनेने हे ईश्वरीय ज्ञान सर्वांना मुक्तपणे दिले जात असे; आज त्याच तटावर वेद मंत्रांचे मंगल ध्वनि कोठेच ऐकू येत नाहीत. कुठलीही पूजा–अर्चा बघायला मिळत नाही. अभिषेक वा आरतीचे नाव नाही. एवढेच काय सिंधूच्या प्रदीर्घ तीरावर एकही मंदिर मंदिराच्या अवस्थेत उरलेले नाही. तथापि भारताच्या कोनाकोपऱ्यात पसरलेल्या सिंधी हिंदूंना जोडणारा सर्वात मजबूत दुवा आहे भगवान झूलेलाल. सिंधूसभ्यता व संस्कृतीचे सर्वात प्रबल व लोकप्रिय प्रतीक एकमात्र ' झूलेलाल ' होय.

सिंध प्रांतात तर हिंदु धर्माचा व संस्कृतीचा सर्वनाश व्हायचा होता. तो झाला आहेच, पण आज संपूर्ण हिंदुस्थानात निधर्मी लोकांच्या दुष्ट कटामुळे आमचा धर्म व संस्कृति पुन्हा एकदा जीवन मरणाचा खेळ खेळत आहेत. आम्ही सर्वांनी, भलेही तो मोठा असो वा लहान, आपल्या अस्तित्वाच्या रक्षणार्थ स्वतःचा क्षुद्र स्वार्थ व भेदभाव विसरून स्वतःस एकतेच्या सूत्रात ओवून घ्यायला पाहिजे. जात पातीवरून किंवा अन्य भेदावरून कोणीही हिंदू छोटा वा मोठा मानला न गेला पाहिजे. तसेच कुठल्याही बंधु-भगिनी बरोबर आम्ही तिरस्काराने किंवा, त्याला अपमानास्पद वाटेल अशा प्रकाराने न वागले पाहिजे. उलट ' हिंदवःसोदराः सर्व सगळे हिंदु सख्खे भाऊ आहेत, हे लक्षात ठेवले पाहिजे. स्वामी विवेकानंदाच्या शब्दात सांगायचे तर प्रत्येक हिंदुस आपण हिंदु असल्याचा अभिमान असायला हवा, आणि कुठल्याही हिंदुवर आलेल्या संकटाच्या किंवा विपत्तीच्या वेळी सगळ्या हिंदूनी सामुहिक व संघटितपणे स्वतःच पुढे येऊन त्यांचे रक्षक व सहायक बनले पाहिजे.

जर आम्ही सर्वांनी सामुहिकरूपाने वरील नीति आचरणात आणली नाही तर थोड्याच काळात भूतकाळातील अवशेषांप्रमाणे धर्म व संस्कृति नामशेष होऊन जातील. पण जर आपल्यातील सद्‌बुद्धी जागी झाली व आपल्या कल्याणाच्या मार्गावर संपूर्ण आत्मविश्वासाने व दृढतेने आम्ही पुढे जाऊ लागलो तर श्रीमद्‌भगवद्‌गीतेतील भगवान श्रीकृष्णाने दिलेले वचन—

यदा यदा हि धर्मस्य ग्लानिर्भवति भारत ।
अभ्युत्थनमधर्मस्य तदात्मानं सृजाम्यहम् ॥
परित्राणाय साधूना विनाशायच्च दुष्कृताम् ॥
धर्मसंस्थापनार्थाय संभवामि युगे युगे ॥

अर्जुना जेव्हा धर्माचा ऱ्हास होतो व सर्वत्र अधर्म बोकाळतो तेव्हा मी आपल्या रुपाला रचतो–अर्थात साकार रुप धारण करून लोकात प्रगट होतो. सज्जनांचा उद्धार, पाप्यांचा विनाश, व धर्माला दृढ करण्यासाठी मी युगायुगात प्रगट होत असतो। श्रीमद्‌भगवद्‌गीता अध्याय ४ श्लोक–७–८ ।

आपल्या रक्षणार्थ भगवान झूलेलाल नेहमीच विद्यमान आहेत. आम्ही सर्वांनी प्रतिदिनी शुद्ध मनाने, कातर व आर्तस्वरात आपल्या लाडक्या हिंदुधर्माच्या व संस्कृतीच्या रक्षणार्थ विनंती केली तर, भगवान झूलेलाल आजही अवतार रूपाने आपल्या रक्षणाकरिता येऊ शकतात. भगवान झूलेलाल ज्योतिस्वरूप व अमरलाल आहेत. ते नेहमीच आमच्यात सूक्ष्म रूपाने उपस्थित असतात. उशीर फक्त तेवढाच आहे. जेवढा की आम्हास भगवान झूलेलालच्या कृपेस पात्र होण्यास लागणार आहे.

# समतेचा ध्वज उंच धरणारी



# पंढरीनगरी

समता हा भागवत धर्मातील शिकवणुकीचा गाभा होय. ज्या पंढरपुरात या समता धर्माची ध्वजा प्रथम फडकली गेली त्याच पंढरपुरात साधुसंतांनी समतेचा आदेश दिला. वारकऱ्यांनी तो आत्मसात केला. भक्तांनी त्याचा प्रसार केला. आषाढीची यात्रा ही समतेचीच साक्षच.

● पंढरीचे सुख नाही त्रिभुवनीं । प्रत्यक्ष चक्रपाणी उभा असे । त्रिभुवनी समर्थ ऐसे पै तीर्थ । दक्षिण मुख वाहात चंद्रभागा । सकळ संतांचा मुकुटमणि देखा पुंडलिक सखा आहे जेथे । चोखा म्हणे तेथे सुखाची मिराशी । भोळ्या भाविकांसी अखंडित ॥

पंढरपूर क्षेत्रास एवढे महत्व प्राप्त करून देण्याचे सर्व श्रेय भक्त पुंडलिकाकडे जाते. चंद्रभागेच्या विस्तीर्ण वाळवंटात मातृपितृ भक्त पुंडलिकाने आपल्या मातापित्याच्या सेवेची कसोटीच लावली असे म्हणावे लागते. कारण तो मातृपितृ भक्तीच्या कसोटीस उतरल्यामुळेच श्रीविठ्ठलाला तेथे येऊन उभे रहावे लागले आणि त्यातूनच चंद्रभागेच्या पात्रात पुंडलिकाचे मंदिर आज शतकानुशतके उभे आहे. पुंडलिकाच्या दर्शनाखेरीज विठ्ठल दर्शनाची वारी सफल होत नाही अशी वारकऱ्यांची धारणा व श्रद्धा असते, विठ्ठल दर्शनापूर्वी चंद्रभागेचे स्नान व पुंडलिकाचे दर्शन घ्यावेच लागते. पुंडलिकावर निरनिराळ्या संतांचे कित्येक अभंग आहेत. अर्थात सर्व संतांनी पुंडलिकाला धन्यवाद दिले आहेत. पुंडलिकाच्या विनंतीमुळे देवाला अजूनपर्यंत विटेवर तिष्ठत उभे रहावे लागले आहे. म्हणून पंढरपूर, पुंडलिक व विठ्ठल या तिहींचा संयोग येथे आहे. विठ्ठलाच्या उभे राहण्याने सर्व संताना तो सुखाचा आगर व पतित पावन आहे. विठ्ठलामुळे पंढरपूरास क्षेत्राचे स्वरूप आले.

## भागवत धर्मातील समानता

पंढरपूर क्षेत्रास दक्षिण द्वारका असे समजण्यात येते. वारकऱ्यांचे उपास्य दैवत श्री विठ्ठल, हे भगवान श्रीकृष्णाचे बाळरूप असल्याचे समजण्यात येते व वारकऱ्यांची यावर श्रद्धा आहे. त्याप्रमाणे भागवत ग्रंथातील अर्थात वारकरी पंथातील उपासक सगुणोपासना, नामस्मरण हरिकिर्तन, पंढरी व आळंदीच्या वाऱ्या इत्यादी गोष्टींनी वारकऱ्यांची साधना बनलेली असते. वारकरी या गोष्टीकडे फार आदराने पाहतात ही साधना आज कित्येक शतके अव्याहतपणे गंगेच्या प्रवाहाप्रमाणे चालूच आहे. भाग-

वत धर्माची शिकवणूकच समानतेची आहे. देवापुढे कोणत्याही जातीचा मनुष्य येऊन भागवत धर्मातील साधनांच्या अवलंबनाने आपली आत्मोन्नती करून घेण्यास मोकळा असतो. देवापुढे उच्च-नीच हा भेदभाव नाही.

वेदशास्त्र प्रमाण मानणाऱ्या सनातन धर्माचा भागवत धर्म हा नवा व लोकप्रिय अवतार आहे. आमच्या आजकालच्या सामाजिक प्रश्नांना व चळवळीनाही या भागवत धर्माने चोख उत्तर देऊन ठेवले आहे. त्यामध्ये गोंधळ, वादविवाद, अहंकार वा पक्षभेद नाही. निर्मळ मनाने निरहंकाराने यामध्ये मिसळून मिथ्या भेदभाव विसरून जावे. व्यवहारातले भेदभाव व्यवहारातच ठेवावेत, परमार्थात आणू नयेत असा संदेश आहे.

## समता धर्माचा ध्वज फडकला

श्री संत चोखोबांच्या काळी पंढरपुरात श्री नामदेवांचे अवतारी कार्य सुरू झाले होते. त्यांनी समता धर्माचा झेंडा पंढरपुरात प्रथम फडकविला त्यावेळी महाराष्ट्रातील जनतेला सामाजिक विषमतेचा असाध्य रोग प्रथमपासूनच जडला होता. कर्मठांच्या वर्णाश्रमाच्या खुनी माऱ्यांमुळे हिंदूमधील ऐक्य व बंधुभाव रसातळास जाण्याच्या मार्गावर होते. अखिल हिंदुत्वाच्या व्यापक कल्पनेला जवळ जवळ मूठमातीच मिळाली होती.

अशा बिकट विपत्काली नामदेवांनी सर्व थरातील लोकांना एकाच ध्वजाखाली येण्याची हाक दिली. भागवत धर्म हा सर्व जातीतील लोकांचा समानतेने वागविणारा धर्म आहे अशी ग्वाही दिली. याचवेळी संस्कृत भाषेच्या रेशमी रुमालात घट्ट बांधलेला वेदांत ज्ञानदेवानी उघडून राजरोसपणे सर्वांना समजणाऱ्या मराठी वा प्राकृत भाषेत लिहून या झेंड्याच्या जवळ ठेवला होता. वैदिक धर्मातील सर्व धार्मिक ग्रंथ संस्कृतात व बहुजन समाज हा काळाच्या ओघाबरोबर त्या भाषेत अनोळखी होत चाललेला अंतःकरणाला जीवनाचा ओलावा देणाऱ्या धर्माचे अज्ञान ज्या वेळेस एखाद्या समाजात वाढते त्यावेळेस तो अज्ञ समाज धर्मांतर करण्यास साहजिकच प्रवृत्त होतो. श्री ज्ञानदेवास ही आपत्ती धडधडीत दिसत होती. एवढ्याचसाठी त्यांनी आपला ग्रंथ मराठीत लिहून बहुजन समाजाला अध्यात्म ज्ञानाचे दरवाजे खुले केले.

## भागवत धर्माचा जीर्णोद्धार

तथापि इतर समाजातील, विशेषतः खालच्या समाजातील लोक या भागवत धर्माच्या ध्वजाखाली येण्यास प्रथम प्रथम बिचकत होता. अशा वेळी महार समाज

तील थोर संत श्री चोखोबा ध्वजाखाली येऊन निर्भयपणे प्रथम उभे राहिले व त्यानी इतर समाजातील लोकांना पाचारण केले. त्यांच्या या धैर्यामुळे इतर समाजातील लोकांचे मनोधैर्य कितीतरी पटीने वाढले. इतर समाजातील लोक भराभर एकत्र येऊन भागवत धर्माच्या झेंड्याखाली समानतेने वावरू लागले. मराठी संतांच्या भक्तिसंप्रदायाने महाराष्ट्रातील बहुजन समाजाच्या धर्मजीवनाला अध्यात्मिक प्रतिष्ठान मिळवून दिले. उच्च वर्णीयांची अहंमन्यता आणि तुसडेपणा यामुळे ज्यांची मने व्यथित झाली होती ते शूद्रातिशूद्र साहजिकच वारकरी पंथाकडेच ओढले गेले. पांडुरंग भावाचा भुकेला आहे. तो जातपात पाहत नाही. आणि वर्णभेदही मानत नाही. ज्ञानेश्वरापासून चोखामेळ्यापर्यंत सर्व जातीचे भक्त त्याला सारखेच प्रिय आहेत. म्हणून विठ्ठल सांप्रदायात उच्च-नीच भावाची उपाधि नाही. जन्मसिद्ध विषमतेची बाधा नाही. भावी काळात हिंदू धर्मियांना खडतर काळातून जावे लागणार आहे याची जाणीव या सर्व संतांना होती. म्हणून भागवत धर्माच्या मंदिराचा जीर्णोद्धार व डागडुजी मजबूत करण्याचे त्यांनी ठरविले.

## संतमंडळींचे अवतार

श्री ज्ञानदेव, नामदेव यांचा काल अनेक दृष्टींनी अपूर्व होता. विष्णूचा अवतार झाला म्हणजे जसे इतर देवही अवतार घेतात, चंद्राबरोबर तारांगणही उदय पावते, त्याचप्रमाणे ज्ञानियांचे राजे ज्ञानदेव आनंदभुवनात अवतरले. त्याकाळी एकदम अनेक संत निर्माण झाले. त्यावेळेस अशी जात राहिली नाही की, ज्यामध्ये संत निर्माण झाले नाहीत. या साधुसंत मेळाव्यात काही स्त्रिया, काही मराठे, कुणबी, शिंपी, माळी, कासार, सोनार पश्चातापाने शुद्ध झालेल्या वेश्या, दासी, अतिशुद्र महार व निम्मेशिम्मे ब्राह्मण अशी मंडळी होती. यावरून असे दिसून येईल की, या अध्यात्मिक उन्नतींचा परिणाम केवळ एकाच जातीवर पडला नसून लहानथोरापर्यंत सर्व समाज तिने वेडा करून टाकला होता. उच्च–नीच, अज्ञ–सुजाण, स्त्री–पुरुष सर्व लोक धर्मानंदात नाचू लागले होते. अशा प्रकारे खालच्या जातीत संत निर्माण होऊन ती जात वा समाज अधिक उंचावला. अशी धर्मजागृती इतर देशात क्वचित सापडेल.

## समतेची राजधानी पंढरपूर

या सर्व साधुसंतांची समानतेच्या धर्माची राजधानीच पंढरपूर होती. प्रचलित काळात सर्व साधुसंतांनी सर्व तीर्थक्षेत्रात श्रेष्ठ तीर्थ म्हणून पंढरी हेच निश्चित केले आहे. ज्ञानेश्वर, नामदेव, एकनाथ, तुकाराम आदि सर्वच संतांची यात एकवाक्यता

आहे. पंढरी महात्म्यावर त्यांचे शेकडो अभंग आहेत. गेल्या कित्येक शतकात या क्षेत्रात साधुसंत, ऋषि, महंत व स्वामी इत्यादिकांनी येथे येऊन वस्ती केली आहे. त्यामुळे पंढरपुरात संताच्या समता भूमीवर विविध मठ व धर्मशाळा यांची गर्दी झालेली दिसते. व्यक्ति वाचक मठ व जातिवाचक धर्मशाळा यांची संख्याही बरीच दिसते. ही गोष्ट थोडी खटकेलच. परंतु हा अपवाद सोडला तरी पंढरपुरात एवढे कशाचे आकर्षण आहे? आकर्षण आहे ते श्री पांडुरंगाचे. एकदा का या देवाचे आकर्षण वाढू लागले की, त्या आकर्षणात गोविले जावे लागते, साधुसंतानी तर पंढरपूर आपले जवळ जवळ निवासस्थानच करून टाकले आहे. यावरून भागवत धर्मातील समतेच्या भावनेने पंढरपूर व विठ्ठल यांचे अभेद्य न तुटणारे नाते जोडले गेले असल्याचे दिसून येईल या प्रेमनगरात वारकरी म्हणूनच गेले पाहिजे व तेथील प्रेमसुख लुटले पाहिजे. तुकारामांनी या विठ्ठल नगरीत प्रेमसुख लुटले म्हणूनच ते सांगतात—

होय होय वारकरी । पाहे पाहे पंढरी ॥


## श्रीसाईलीला
## भव्य दिवाळी अंक १९८२
# भक्त अनुभव विशेषांक
**१ नव्हेंबर १९८२ रोजी थाटात प्रसिद्ध होणार**

साईभक्तांनी बाबांच्या विषयी आलेले आपले ताजे अनुभव अगदी थोडक्यात कागदाच्या एकाच बाजूने लिहून पाठवावेत. आपले अनुभव २५ जुलै १९८२ पर्यंतच आमचे हाती यावेत. त्यानंतर आलेल्या अनुभव मजकूरांचा स्वीकार करता येणार नाही.

सर्व मजकूर संपादक श्रीसाईलीला, साईनिकेतन ८०४ बी. डॉ. आंबेडकर मार्ग, दादर, मुंबई ४००० ०१४ येथेच पाठवावा.

मुखपृष्ठावर भगवान श्रीसाईनाथांचे बहारदार चित्र

**किंमत २ रु.)** (पृष्ठे १२८

# जीवनात सद्‌गुरू महत्वाचा

**व्यासपौर्णिमा गुरुपौर्णिमा सर्वत्र मोठ्या प्रमाणात साजरी केली जाते. महर्षि व्यासानी या मानवतेवर जे महान उपकार केलेत त्याचेच स्मरण म्हणून गुरुपौर्णिमा साजरी होते. या पौर्णिमेचे महत्व विशद करणारा हा लेख.**

महाभारतकार व्यासांनी वेदांच्या शाखा निर्माण केल्या. अल्पबुद्धीचे लोक पाहून त्यांच्या उद्धारासाठी अठरा पुराणांची रचना केली. ब्रह्मसूत्रे लिहिली. व्यास हे नारायणाचे सातवे अवतार, महर्षी न्यायरत्न विनोद म्हणतात, ‘ व्यास म्हणजे विस्तार, विशालता, व्यापकता ! ’ आत्मविकासाच्या खुणा शोधीत भारतीय जनता ही गुरु-पौर्णिमा परंपरेने करीत आली आहे. गुरूपूजा हा एक पारंपारिक उत्सव आहे.

मानवी जीवनात गुरूला अनन्य साधारण महत्व आहे. जन्मल्यानंतर माता ही गुरू असते. पुढे पिता गुरू असतो आणि नंतर शिक्षक गुरु बनतो. संत हा आध्यात्मिक गुरु आहे. गुरु नसेल तर मानवी जीवन निष्फळ ठरते. म्हणून संतश्रेष्ठ तुकाराम बुवा म्हणतात. ‘ सद्‌गुरु वाचोनि सापडेना सोय । धरावे ते पाय आधी आधी ॥ ’ ज्ञानियाचा राजा ज्ञानदेव म्हणतात, ‘ नमो सुभावभजनभाजना । भवेभकुंभभजना ॥ विश्वोद्‌भवभुवना । श्रीगुरुराया ॥’ संसाररूपी हत्तीचे गंडस्थल फोडणारा, (आध्यात्मिक) विश्वाचे उगमस्थान अशा हे श्रीगुरुराया, तुला नमस्कार असो !

गुरुमहात्म्य अगाध आहे. जीवनाचा मार्ग शोधण्यासाठी गुरुची नितांत आवश्यकता आहे. ब्रह्मा विष्णू महेश्वराच्या अंशाने त्रिमूर्ती बनलेल्या श्रीदत्तात्रयाने पशूपक्षातून चोवीस गुरु निवडले आणि मानव उद्धाराचे कार्य केले. खरा गुरु शिष्याला ज्ञानवंत बनवतो. आपल्यापेक्षा श्रेष्ठ बनवितो. रामकृष्ण परमहंसानी विवेकानंदाना महान बनविले. परिस लोखंडाला सुवर्ण बनविते. परंतु सुवर्ण लोखंडाला सुवर्ण बनवू शकत नाही. तथापि गुरुने शिष्याचा उद्धार केल्यानंतर तो शिष्य दुसऱ्याचा गुरु बनू शकतो. म्हणून तुकाराम महाराज म्हणतात, ‘ लोह परिसाची नसा हे उपमा ॥ सद्‌गुरु महिमा अगाधची ॥ ’

व्यावहारिक जीवनात जशी गुरूंच्या मार्गदर्शनाची जरुरी आहे तशीच समाज-जीवनात व राष्ट्रजीवनातही गुरुची आवश्यकता आहे. गुरूंच्या शिकवणीतूनच समाजा

विषयी प्रेम आणि राष्ट्रासाठी समर्पणाची भावना निर्माण होऊ शकते. आपल्या देशात सार्वजनिक जीवनात गुरुपरंपरा नाहीशी होत चालल्यामुळे देशामध्ये सर्वच क्षेत्रात अनास्था, द्वेष, मत्सर, सूडभावना या अनिष्ठ प्रवृत्ती बोकाळल्या असे विचारांती दिसून येईल. न्यायदृष्टी लुप्त होत चालली आहे. तुकाराम महाराज म्हणतात, 'तुका म्हणे ऐसे आंधळे हे जग । गेले विसरोनि खऱ्या देवा ॥'

देशाचा, समाजजीवनाचा किंवा व्यक्तीचा आज विचार करता आपण गुरुला पारखे झालो आहोत. त्यामुळे व्यक्ती व्यक्तीत स्वार्थ, असूया आणि परस्पर द्वेष हीच भावना वाढत चालली आहे. आपल्या भारतीय परंपरेला हे विसंगत आहे. याकरिता प्रत्येकाने लक्षात ठेवले पाहिजे. गुरुर्ब्रह्मा, गुरुर्विष्णुः गुरुर्देवो महेश्वरः। गुरुःसाक्षात् परब्रह्म । तस्मै श्रीगुरवे नमः ॥

卐

# श्रीसाईनिकेतनमधील नृसिंह जयंती

## श्रीसाईगीतांजलीचे प्रकाशन

गुरुवार दिनांक ६–५–८२ रोजी नृसिंह जयंतीच्या मुहूर्तावर 'साईनिकेतन' दादर येथे श्री. प्रभाकर कोळमकर यांच्या 'श्री साईगीतांजली'चे प्रकाशन 'श्री साई लीला'चे संपादक (इंग्रजी आवृत्ती) डॉ. श्री. दि. परचुरे यांच्या हस्ते झाले. सुरुवातीस श्री. कोळमकरांनी 'बाबांनी आपल्या हातून १०१ साईगीतांचा संकल्प कशा प्रकारे पूर्ण करून घेतला, त्यातून 'साईगीतांजली' ची कल्पना कशी प्रसविली ते सांगितले. प्रमुख पाहुणे म्हणून बोलताना भक्तीसंगमचे संपादक श्री. सुधाकर सामंत यांनी 'बाबा कबीराचे अवतार आहेत हे पटवून दिले. साईंचे चमत्कार आजही कसे घडतात हे सांगताना त्यांनी श्रोत्यांना मंत्रमुग्ध केले. श्री. र. श्री. जुन्नरकरांनी 'साईगीतांजली' चे संपादन व इंग्रजी अविष्कार कसा केला ते सांगितले तर श्री. कोळमकरांना 'साईगीतांजली'ची कल्पना सुचवून साईकवी बनविणाऱ्या श्री. विजय हजारेनी 'आतापर्यंत एक साईपंथी वेडा होता ते दोन झाले. कारण कोळमकर खऱ्या अर्थी साईकवी झाल्याची पावती म्हणजेच 'साईगीतांजली' असे प्रतिपादन केले. आपल्या अध्यक्षीय भाषणात 'श्री साईगीतांजली'चे महत्व विशद करून डॉ. परचुरेनी कोळमकरांना, त्यांच्या 'प्रतिभा' प्रकाशनाला 'बाबांच्या आशिर्वादासह शुभेच्छा दिल्या. प्रकाशन समारंभाला डॉ. अ. का. पाठक, रमाकांत पंडीत, वसुंधराताई चोरे, चाळके बंधू, श्री. कर्णिक, नवशक्तीचे श्री. बाक्रे वगैरे मान्यवर साईभक्तांसह बराच मोठा समुदाय उपस्थित होता.

# ज्ञानदेवांची गुरुभक्ती

● ज्ञानेश्वरीच्या नवव्या अध्यायापासून ज्ञानदेवांनी प्रत्येक अध्यायाच्या प्रारंभी श्रीगुरु, संत, श्रीकृष्ण व गीता यांच्या स्तवनासाठी काही ओव्या गुंफल्या आहेत व नंतरच गीतेचा भावार्थ सांगण्यास प्रारंभ केला आहे. त्यातही सद्‌गुरु स्तवनालाच प्राधान्य आहे.

दहाव्या व बाराव्या अध्यायाच्या प्रारंभी ज्ञानदेवांनी संस्कृत प्रचुर शब्दांनी सद्‌गुरुचे स्तवन केले आहे. दहाव्या अध्यायातील श्रीगुरुरायावर मुक्तपणे उधळलेली श्रुतिमधुर विशेषणे वारंवार वाचावीशी वाटतात. ती जितकी श्रुतिमधुर तितकीच अर्थवाही व वास्तव आहेत. 'नमो' या नमनार्थक शब्दांनी प्रारंभ होणाऱ्या या दोन तीन ओव्या या ठिकाणी देण्याचा मोह अनावर होतो.

नमो जगदखिल पालना । मंगळमणि निधाना ॥
स्वजन वन चंदना । आराध्यलिंगा ॥ ३ ॥
नमो चतुरचित्त चकोरचंद्रा । आत्मानुभव नरेंद्रा ॥
श्रुतिगूण समुद्रा । मन्मथ मन्मथा ॥ ४ ॥
नमो सुभावभजन भाजना ।
भवेभकुंभ भजना विश्वोद्भव भुवना । श्रीगुरुराया ॥ ५ ॥

तुकाराम महाराज ज्याप्रमाणे आपल्या अभंगाचे कर्तृत्व आपला शिकवीता धनी जो विश्वंभर त्याचेवर सोपवून मोकळे होतात. ते म्हणतात—

'काय म्या पामरे बोलावी उत्तरे । परि त्या विश्वंभरे बोलवीले ।'

त्याप्रमाणे आपल्या ओवीचे सारे कर्तृत्व श्रीगुरुनिवृत्तिनाथांवर सोपवून ज्ञानदेव अलिप्त रहातात. ते म्हणतात—

तीरे संस्कृताची गहने ।
तोडोनी मऱ्हाटिया शब्द सोपाने ।
रचिली धर्म निधाने । श्री निवृत्ति देवे ॥

याही पुढे जाऊन ज्ञानदेव म्हणतात. रिकाम्या तोंडाने काहीही बडबड करण्याकरिता म्हणून मी तोंड उघडले आणि आश्चर्य असे की त्यातून सुरस गीतेचा अनुवाद प्रगट होऊ लागला हे सामर्थ्य सद्‌गुरुकृपेचे आहे.

म्हणोनि रिकामे तोंड । करु गेले बडबड ।
की गीता ऐसे दुवाड । आंतुडले ॥

सद्गुरू निवृत्तिनाथांनी माझे अज्ञान नाहीसे करून मला ज्ञानाची योग्यता दिली माझा संसार मोक्षमय केला.

ज्ञानदेवांच्या गुरुभक्तीचे सहस्त्रदल कलम तेराव्या अध्यायातील आचार्योपासनम् या ज्ञान लक्षणाचे विलक्षण भक्तिभावाने वर्णन करताना पूर्णपणे विकसित झाले आहे. अंतर व बाह्य भावाने गुरुची सेवा कशी करावी याचा सर्वोच्च आदर्श या ठिकाणी ज्ञानदेवानी निर्माण केला आहे. गुरुचे भवन मीच होऊन तेथील सर्व दास्यही मीच करीन हे सांगताना या दास्याचा सूक्ष्मतम तपशील इतक्या विस्ताराने वर्णन केला आहे की विसरू म्हटले तरी तो विसरता येणार नाही. ज्ञानदेव सांगतात निर्गमागमी दातारे । वोलंडिजती उंबरे ।

आता हृदय हे आपुले । चौफळूनिया भले ।
वरी बैसवू पाऊले । श्री गुरुची ॥

ज्ञानदेवांनी सांगितलेला हा गुरुभक्तिचा महिमा लौकीक सूर्यापेक्षा सद्गुरु स्वरुप अलौकिक सूर्याचा महिमा श्रेष्ठ आहे.

ते मी होईन द्वारे । आणि द्वारपाल ॥

गुरुंच्या पादरक्षा मीच होईन. त्यांच्या पायातल्या घालण्याचे काम मीच करीन छत्र चामरे मीच होईन. ती धरणाराही मीच गुरुंचे तस्त मीच, ते करणाराही मीच. गुरुंच्या स्नानाचे पात्र मीच व त्यांना स्नान घालणाराही मीच. त्यांचा आचारी मी वाढपी मी व उष्टी काढणाराही मीच, त्यांचा बिछाना मी बिछाना घालणारा व पाय चेपणाराही मीच.

देह असेतोपर्यंत ही सारी सेवा मी करीनच पण देहपातानंतर माझ्या देहाची माती गुरुचरणाखाली पडावी. माझे गुरु ज्या पाण्याला स्पर्श करतात त्या पाण्यात माझ्या देहातील जलतत्व विलीन होवो. गुरूभवनातील दिव्यात अथवा गुरुंना ओवाळण्याच्या नीरांजनात माझ्यातील तेजतत्व लय पावो. गुरुंना वारा घालण्याच्या पंख्यात माझ्यातील वायूतत्व हरपो व गुरुभवनातील अवकाशात माझ्यातील आकाशतत्व मिसळो. देहपातानंतरच्या गुरुसेवेच्या या कल्पनांनी वाचक अक्षरक्षः अवाक बनतो व स्वतःला हरवून या कल्पनाचित्राशी एक रुप होऊन जातो. ज्ञानियाच्या राजाला आधीच

ज्ञानलक्षणे परमप्रिय, त्यातून आचार्योपासना हा त्यांच्या खास जिव्हाळ्याचा विषय मग ज्ञानदेवांच्या प्रतिभेचे कारंजे सहस्रधारानी प्रस्फुटित व्हावे यात विस्मय नाही.

चौदाव्या अध्यायापासून अठराव्या अध्यायाअखेर प्रत्येक अध्यायाच्या प्रारंभी ज्ञानदेवांनी अत्युत्कृष्ट उपमा रूपकानी सद्गुरूना वंदन करणाऱ्या काही ओव्या लिहून नंतर गीतार्थास सुरवात केली आहे दहाव्या अध्यायाचा प्रारंभ ' नमो ' या नमनगर्भ शब्दानी ज्ञानदेवानी केला आहे तर बारा व अठरा या अध्यायांचा प्रारंभ ' जयजय' या द्विरुक्त विजयवाचक शब्दानी करून सद्गुरूच्या कीर्तीचा जयनाद जगभर घुमवला आहे.

चौदाव्या अध्यायात समस्तसुरवर्य, आर्तबंधू, निरंतरकारुण्यसिंधू या सर्वोत्तम विशेषणांनी संबोधित करून सद्गुरूंना नमन करताना ज्ञानदेवांनी सद्गुरूचे सर्वात्मक सर्वेश्वराशी ऐक्य प्रस्थापित केले आहे. जलाला रसत्व, पृथ्वीला क्षमत्व व सूर्य चंद्राना तेज गुरुदेवामुळेच प्राप्त झाले आहे असे सांगत ज्ञानदेव पुढे म्हणतात. ' हे सद्गुरो तुमच्या कृपेचे भांडार खुले करून माझ्या बुद्धीची झोळी भरा. माझी प्रज्ञावेल काव्यफलांनी समृद्ध होण्यासाठी तुम्ही वसंत ऋतु बना. माझ्या बुद्धीगंगेला प्रमेयाचा महापूर येण्यासाठी तुमचा कृपामेघ मुसळधार वर्षाव करू दे आणि या प्रार्थनेचा कळस ज्ञानदेवांच्या शब्दातच मांडला पाहिजे मला तो अनुवादताच येणार नाही. ' ' अगा विश्वैक धामा तुझा प्रसादु चन्द्रमा । करू मज पूर्णिमा । स्फूर्तीची जो ॥ ' जी अवलोकलिया माते । उन्मेष सागरी भरिते । वोसंडेल स्फूर्ती ते । रसवृत्तीचे ॥

आता हृदय हे आपुले । चौफळूनिया भले । वरी बैसवू पाऊले । श्री गुरूची ॥'
पंधराव्या अध्यायाच्या या पहिल्याच ओवीबरोबर गुरू भक्तीची उच्च पातळी गाठली जाते. आणि नंतर पूजोपचाराना प्रारंभ होतो.

अर्घ्य–ऐक्य भावाच्या ओंजळीतून सर्व इंद्रियरूपी कमळ कलिकांची पुष्पांजली वाहून अर्घ्य दिले जाते.

जल अनन्य भक्ती, चंदन–चरण भक्तीची उत्कट वासना.

अलंकार–नूपुरे–विशुद्ध प्रेमाच्या बावनकशी सोन्याची सुकुमार पाऊलासाठी आंगोळी ( पाण्याच्या अंगठ्यात घालावयाचा अलंकार अव्यभिचारी आवड.

पुष्प अष्ट सात्विक भावानी विकसित झालेले व विशुद्ध आनंदाच्या सुगंधाने दरवळणारे अष्टदल कमल.

धूप—अहंकाराची धूप जाळू.

दीप—नाहतेज ओवाळू, (तूच सर्व काही आहेस मी नाहीच याच भावनेचा दीप).

अलिंगन—सामरस्ये पोटाळू. (सद्‌गुरूशी समरसून जाणे हेच अलिंगन)

वस्त्र—एका पावलात शरीराचे व दुसऱ्या पावलात प्राणाचे वस्त्र समपण करू. शरीर व प्राण यांच्या वस्त्रांनी श्रीगुरूचरणांना विभूषित करण्याची कल्पना केवढी रोमांचकारी आहे. कातड्याचे जोडे करण्याची कल्पना गुरुभक्तीला साजेशी आहे तथापि प्राणाचेही मोल गुरुचरणांच्या संदर्भात त्याहून अधिक नाही हे सांगणाऱ्या ज्ञानदेवांच्या उद्‌गाराना जोड सापडणे कठीण आहे. निंबलोण उतरणे भोग आणि मोक्ष या दोहोंचेही निंबलोण गुरूचरणांवरून उतरून टाकणे म्हणजे गुरूभक्तीचा सर्वोच्च आदर्श. तुकाराम महाराजही म्हणतात 'नलगे मुक्ती धन संपदा.'

या गुरुचरण पुजनाची फलश्रुती यापुढे ज्ञानदेव सांगतात. सर्वस्व समर्पणाच्या या पूजा विधानाचे फळही तसेच अलौकिक आणि असामान्य असले पाहिजे. ज्ञानदेव सांगतात—ज्याला गुरुपद पद्मपराग लाभले त्याच्या दैवाची थोरवी काय वर्णन करावी! तो चारही पुरुषार्थाचा अधिकारी होतो. पंधराव्या अध्यायातील श्रीगुरुचरणांचा पूजन विधि व त्याची फलश्रुती आपण पाहिली. आता सोळाव्या अध्यायातील सद्‌गुरुस्तवनाचे प्रास्ताविक पाहू.

या प्रास्ताविकात सद्‌गुरूना चित्सूर्याची उपमा दिली आहे. प्रत्यक्ष डोळयांनी दिसणारा सूर्य पूर्व क्षितिजावर प्रगटल्यानंतर जे उत्साहवर्धक परिवर्तन वातावरणात घडून येते त्याच तऱ्हेचे परिवर्तन सद्‌गुरुरूप चित्सूर्याच्या उदयाने गुरूभक्ताच्या चिदाकाशात निर्माण होते. हे रूपक इतके परिपूर्ण व चपखल बसणारे आहे की याच्यासारखे हेच एवढेच शद्ब कोणाही वाचकाच्या मुखातून उत्स्फूर्तपणे बाहेर पडावेत.

★

219

# एकादशीचे महत्व

● प्रत्येक महिन्यात एक शुक्लपक्षात व एक कृष्णपक्षात याप्रमाणे संपूर्ण वर्षामध्ये एकूण चौवीस एकादशी येतात. अधिक मास असल्यास त्या दोन एकादशी जास्त असतात. पण त्यापैकी आषाढी व कार्तिकी एकादशी आणि त्याहीपेक्षा आषाढी एकादशीचे महत्व अधिक मानण्यात येते. आषाढी एकादशीस शयनी (भगवान् श्रीविष्णू झोपतात) कार्तिकी एकादशीस प्रबोधिनी (श्रीभगवान विष्णू जागे होतात.) एकादशी म्हणतात.

एकादशीच्या दिवशी सकाळी लवकर उठून नदीवर अथवा समुद्रावर जाऊन स्नान करुन आपल्या कुलदैवताची व विष्णूची पूजा करावी. उपवास करावा, पूजेला एक हजार किंवा एकशे आठ तुळशी वहाव्यात. उपवास तुळशीपत्र घेऊन सोडावा. हरिकथा श्रवण कराव्यात व दुसऱ्या दिवशी सुर्योदयानंतर पारणे सोडावे. ज्येष्ठ महिन्यातील शुक्लपक्षात येणाऱ्या निर्जला एकादशीला भाविक पाण्याचा थेंबदेखील घेत नाहीत.

एकादशीच्या व्रतामुळे दुहेरी फायदा मिळत असतो. पुण्यप्राप्ती होते, मन व चित्त प्रसन्न राहते. पंधरा दिवसातून एक दिवस उपवास केल्यामुळे, आपल्या शरीरातील इंद्रियांना विश्रांती मिळते.

आषाढ महिन्यातील एकादशीला फार पवित्र मानण्यात येते. म्हणून या एकादशीला महाएकादशी म्हणतात. या महिन्यातील अत्यंत आनंदाचा हा दिवस असतो. पांडुरंगाच्या भेटीसाठी कोसच्या कोस पावसापाण्यात भिजत चिंबत जाणारा वारकरी भक्तांचा सोहळा अत्यंत मनोरम्य असा असतो. या एकादशीस आळंदीहून, ज्ञानेश्वराची, देहूहून तुकारामाची, त्र्यंबकेश्वरहून निवृत्तीनाथाची, सासवडहून सोपानदेवाची पैठणहून एकनाथाची, दहिठाण्यावरून दहिठणकरांची व उत्तर हिंदुस्थानातून कबीरांची दिंडी येते. महाराष्ट्रातून तीन लाखापेक्षा अधिक भाविकांची चंद्रभागेच्या काठी दाटी होते.

आषाढी एकादशीचा हा दिवस म्हणजे परस्परांवर प्रेम करावे. प्राणीमात्रावर भूतदया दाखवावी. भविष्यातील अडीअडचणींचा सखोल विचार करावा. अंध, पंगू, गरीब यांना दान (मदत) करावी. स्वार्थ सोडून निःस्वार्थी जीवन जगावे. अशा

जीवनातील आदर्श शिकवणूकीचा दिवस आहे. या दिवशी व्रत पार पाडताना हा संदेश घेऊन पुढे जाऊ व पुढील यशस्वी जीवनाची जोपासना करू.

एकादशी म्हणजे उपवासाचा दिवस. बरोबर बोलायचे तर उपास म्हणजे उपवास याचा अर्थ खरोखरच जवळ रहाणे असा आहे. कशाच्या जवळ रहावयाचे ! देवाच्या जवळ रहावयाचे पण देवाच्या जवळ रहावयाचे तर मन शुद्ध पाहिजे. मोकळे प्रसन्न पाहिजे. मन तसे हवे असेल तर शरीर सुद्धा तसेच असायला हवे.

म्हणून एकादशीच्या दिवशी खरीं एकादशी करणारे लोक काही खात नाहीत. पाणी मात्र पितात परंतु पाणीसुद्धा तोंडात न घालता एकादशी करणारे लोक आहेत. काहीही न खाता केलेली एकादशी ती निराहार पाणी सुद्धा न पिता केलेली ती निर्जली.

या संबंधीची गोष्ट पद्‌म् पुराणात सांगितली आहे. ही गोष्ट आहे कृत युगातली. त्यावेळी तालजंघ नावाचा एक भयंकर राक्षस होता. तो राक्षस जरी असला तरी त्याचा जन्म ब्रह्मदेवाच्या वंशात झालेला होता. त्याला एक मुलगा होता. त्याचे नाव होते मूर तो आपल्या बापाहूनही बलाढ्य होता. त्याची राजधानी चन्द्रावती नावाच्या नगरीत होती.

मूर राक्षसाने स्वर्गावर स्वारी करून देवांचे राज्य हिरावून घेतले. देव स्वर्गातून पळून पृथ्वीवर रहायला गेले. इंद्राचे राज्य गेले. तरीही मूर त्यांचा छळवाद करीतच राहीला तेव्हा देवांनी इंद्राला पुढे घातले व ते शंकरापुढे आले. मुराला मारायला काय उपाय करावा म्हणून ते त्यांना विचारू लागले.

शंकरानी इंद्राला विष्णूकडे पाठवून दिले. इंद्राने विष्णुची स्तुती केली. तो विष्णूना म्हणाला. 'देव श्रेष्ठा, या मूर राक्षसापासून आमचे रक्षण करा. त्याने तिन्ही लोकांचे राज्य बळकावले आहे. तुम्ही नेमलेले रक्षक त्याने काढून टाकले आहेत म्हणून आम्ही तुला शरण आलो आहोत. आमचे रक्षण करायला तूच समर्थ आहेस.'

इंद्राचे बोलणे ऐकून विष्णूला मुराचा राग आला. त्यांनी त्याला धीर दिला. देवानाच बरोबर घेऊन चंद्रावती नगरीवर चढाई केली. परंतु देव मूर राक्षसाच्या नुसत्या गर्जनेनेच पळून गेले. एकटे विष्णु मात्र आपल्या सुदर्शन चक्राने लढत राहीले शस्त्रांच्या लढाईत कोणीच कोणाला हार जाईना.

मग मात्र विष्णूनी तेथून काढता पाय घेतला. ते बदरीकाश्रमात आले. तेथल्या सिंहावती नावाच्या प्रचंड गुहेत जाऊन लपले, आणि आपल्या योगमायेला पुढे करून ते कुशल झोपी गेले.

मूर राक्षस तेवढ्यात तेथे आलाच पण त्याला ह्या गुहेत विष्णू दिसले नाहीत. त्या ऐवजी त्याला तिथे एक सुन्दर मुलगी दिसली पण तिच्या हातात भयंकर शस्त्रास्त्रे होती तेव्हा मुर तिच्याशीच लढायला सरसावला पण त्या मुलीने नुसत्या हुंकारानेच त्या राक्षसाला जाळून भस्म करून टाकले.

लवकरच विष्णू जागे झाले. त्यांनी समोर पाहिले. तो एक आयुधे घेतलेली मुलगी उभी आहे व मूर राक्षस मरून पडला आहे. त्यांनी त्या मुलीलाच विचारले 'मुली हा पराक्रम कोणी केला ?' त्यावर मुलीने उत्तर दिले या राक्षसाने देवादिकाना सुद्धा जिंकले. तुम्ही येथे येऊन झोपी गेलात. म्हणून ही कामगिरी मी पार पाडली आणि हे सगळे तुमच्याच कृपेमुळे मला करता आले.

ते ऐकून विष्णू प्रसन्न झाले. त्या मुलीला त्यांनी वर मागून घेण्यास सांगितले तेव्हा तिने वर मागितला की, 'हे देवाधिदेवा, तिन्ही भवनामध्ये (स्वर्ग, पृथ्वी व पाताळ) आणि चारही युगामध्ये (कृत, त्रेता, द्वापार व कली) मला श्रेष्ठपणा मिळाला पाहिजे. आणि सर्व संकटे दूर करण्याची युक्ती माझ्या ठिकाणी आली पाहिजे. जो कोणी माझ्या या अवताराच्या दिवशी संबंध दिवस उपास करील किंवा फक्त संध्या-काळी जेवेल त्याच्यावर तू प्रसन्न व्हावेस आणि त्यांच्या इच्छा पूर्ण कराव्यास.'

विष्णुनी तिला तसा वर दिला आणि तिचे नाव 'एकादशी' असे ठेवले. तीच ही एकादशी.

## एकादशांची पंचवीस नावे

प्रत्येक महिन्यात दोन एकादश्या येतात. पहिल्या म्हणजे शुक्ल किंवा शुद्ध पंधरवड्यातील एक आणि दुसऱ्या वद्य किंवा कृष्ण पंधरवड्यातील दुसरी. प्रत्येक एकादशीला वेगळे नाव आहे.

| महिना | पहिली एकादशी | दुसरी एकादशी |
|---|---|---|
| चैत्र | कामदा | वरुथिनी |
| वैशाख | मोहिनी | अपरा |

| महिना | पहिली एकादशी | दुसरी एकादशी |
|---|---|---|
| ज्येष्ठ | निर्जला | योगिनी |
| आषाढ | शयनी | कामिका |
| श्रावण | पुत्रदा | अजा |
| भाद्रपद | परिवर्तिनी | इन्दीरा |
| आश्विन | पाशांकुशा | रमा |
| कार्तिक | प्रबोधिनी | उत्पत्ति |
| मार्गशीर्ष | मोक्षदा | सफला |
| पौष | पुत्रदा | षष्ठतिला |
| माघ | जया | विजया |
| फाल्गुन | आमलकी | पापमोचनी |

आधिक महिन्यात येणाऱ्या एकादशीला कमला म्हणतात. या प्रत्येक एकादशीचे महात्म व कथा वेगवेगळी आहे. आषाढी व कार्तिक या दोन एकादशा पहिल्या पंधरवड्यातील आपल्या मराठी मुलखात विशेष महत्वाच्या असतात. ☆

# श्रीसाईकृपा

—सौ. **विनीता अ. केंकरे**
राजवाडा, म्हापसा, गोवा

● माझा द्वितीय मुलगा चि. मांगिरीश हा बालपणी फार मस्त होता. वयाच्या २॥, ३ वर्षांचा असताना त्याला एक भयंकर वाईट सवय होती. ती म्हणजे जी कोणी लहान मुलं त्याच्या समोर दिसली की तो त्यांना ढकलून खाली पाडी.

जेव्हा तो ३॥ वर्षांचा झाला तेव्हा मला फार पंचाईत पडली. कारण त्याला आता शाळेत पाठवायचा होता, आणि त्याचा अग्रीचा वर्ग नेमकाच तिसऱ्या मजल्यावर! एकाद्या मुलाला वरून ढकलून लावलं तर काय परिस्थिती होणार बघा. म्हणून मी बाबांना आर्त प्रार्थना केली की मी "श्री साईसतच्चरित्राचा" सप्ताह करीन. त्याला शाळेत तरी अशी बुद्धी देऊ नका. व त्याचे लक्ष शिक्षणाकडे असू देत. मी एका वर्षाच्या आत "साईलीले"त अनुभव पाठवीन.

पण श्री साईंच्याच कृपेने माझ्यावर तसा प्रसंग केव्हाच आला नाही आणि आता त्याची मस्ती फार कमी झाली आहे, व फार समजूतदारही झाला आहे. प्रत्येक परीक्षेला चि. मांगिरीशने चांगला नंबर पटकावला आहे, आणि आता त्याचा तिसरा नंबर नऊमाही परिक्षेला आला आहे.

अशीच चि. मांगिरीशवर व आम्हा सर्वांवर बाबांची सदैव कृपादृष्टी असो, हीच श्री बाबांपुढे त्रिकाल प्रार्थना.

# साईभक्ती कशी करावी

—श्री. पां. वा. भुतकर
२३/१६७५ अभ्युदयनगर
काळाचौकी मुंबई ४०० ०३३

● साईभक्ती कशी करावी ? अगदीच सोपा प्रश्न व तेवढाच अवघड. कोणी म्हणेल धूप, दीप, अगरबत्ती, नैवेद्य दाखविला व यथासांग पूजा केली की झाली साई-भक्ती दुसरे कोणी म्हणेल की मनाने चिंतन केले की झाली साईभक्ती. अर्थात, वरील गोष्टी केल्या म्हणजे साईभक्ती होत नाही असे नाही.

हेमाडपंतांनी या बाबतीत या अगोदरच साईभक्ती कशी करावी, साधकाची मानसिक स्थिती कशी असावी, याबाबत मार्गदर्शन केले आहे.

काम-कर्म-बंध विमुक्त ।
सर्वेषणा विनिमुक्त ।
देह-गेहा दिकी विरक्त ।
जगी भक्त तो धन्य ॥ ७१ ॥

वर दिलेल्या वचनाप्रमाणे त्याचे मन ऐहिक विषयांपासून विरक्त असले पाहिजे फक्त मन परमेश्वराच्या ठायी एकाग्र झालेले पाहिजे हीच खरी भक्ती. बाकीचा वरवरचा दांभीक देखावा. याकरीता मानसिक पातळी अध्यात्मीक पातळीवर नेली पाहिजे. सर्वसमभाव, सर्व बंधुत्व हे नाते मनाशी एकरूप व्हावयास हवे.

साईजयाचा दृष्टि विजय ।
तया विश्वंतर दिसेल काय ।
दृष्य मात्री साईशिवाय ।
रिकामा ठाय दिसेना ॥ ७२ ॥

वदनी श्रीसाईंचे नाम ।
हृदयी श्रीसाईंचे प्रेम ।
तया नित्य आराम क्षेम ।
रक्षी स्वयमेव साई त्या ॥ ७३ ॥

या प्रमाणे ज्याच्या दृष्टीसमोर सदैव साई असेल त्याला या जगात साईशिवाय दुसरे कोणी दिसणारच नाही. ज्याच्या तोंडी सदैव श्रीसाईचेच नाम असेल त्याचे रक्षण सदैव श्रीसाईनाथ करतीलच यात मुळीच संदेह नाही. असा भक्त सर्वार्थाने साईनाथाशी एकरूपच झाला असेल. इतकेच नव्हे तर,

श्रवणाचीही तीच गत ।
शब्द नाही साई व्यतिरिक्त ।
घ्राणी साई परिमळ भरत ।
रसना पघळत साईरसे ॥ ७४ ॥

या प्रमाणे सर्व इंद्रिये ही ज्यावेळी साईच्या चरणी त्यांची सेवा अर्पण करतील त्याना त्याशिवाय इतर सर्व विषय त्याज्य असतील, त्यावेळी त्याचे साईपदी तादात्म्य पावेल. खरी भक्ती ती हीच !

साईबाबांची दासगणूवर फार कृपा होती. एकदा विशेष पर्वाच्या निमित्ताने गोदास्नानास दासगणूना जावयाचे होते. बाबा काही परवानगी देईनात. आज्ञा मोडून जाता येईना. उद्या महादेव पर्व आज तरी ते आज्ञा देतील असे दासगणूना वाटले पण बाबा म्हणाले.

गणू, इतका कारे तळमळतो, गोदास्नानातच काय आहे ?
तुकारामाच्या भोपळ्याची गोष्ट, माहीत आहे का तुला ?
आतून स्वच्छ, पवित्र व्हावे, कातडी भिजवून काय होणार ?

यातच खऱ्या भक्तीचे सार आहे. वरवरचे गंगास्नान व्यर्थ आहे. साईबाबांनी याबाबतीत आपल्या भक्तांना पूर्वीच सांगितले आहे.

माझा जो जाहला कायावाचा मनी ।
तयाचा मी ऋणी सर्वकाळ ।
साई म्हणे तोचि, तोचि झाला धन्य ।
झाला जो अनन्य माझ्या पायी ॥ ७५ ॥

# असा हा-पौर्णिमांचा महिमा

● वर्षातील मुख्य ऋतू तीन. उन्हाळा, पावसाळा, हिंवाळा. या प्रत्येक ऋतूचे पोट ऋतु तीन आहेत. उन्हाळ्यात-वसंत व ग्रीष्म, पावसाळ्यात-वर्षा व शरद आणि हिवाळ्यात-हेमंत व शिशीर! तसेच महिन्यातील दोन पक्ष. शुद्ध पक्ष आणि कृष्ण पक्ष. पौर्णिमेला पूर्ण चंद्र तर अमावस्येला पूर्णपणे काळोख असतो. तेव्हा प्रत्येक महिन्याच्या पौर्णिमेला विशेष महत्व प्राप्त झालेले आहे.

**चैत्रपौर्णिमा-हनुमान जयंती**-प्रभु रामचंद्राने रावणाचा व राक्षसकुळाचा नाश केला. या कामी काया वाचा मने करून ज्याने मदत केली त्या हनुमंताच्या जन्माचा हा दिवस म्हणून ही पौर्णिमा ओळखली जाते.

केसरीनामक वानराची पत्नी अंजली हिला महादेवाच्या अनुग्रहाने पुत्र झाला. त्याने जन्मताच उड्डाण करून सूर्यमंडळाला हात घातला. हनुमान हा अत्यंत बलाढ्य, धाडशी, धोरणी व सत्वशील असल्याचे रामायणात वर्णन आहे. त्याच्याइतका स्वामी-भक्त, गुरुभक्त व राजनिष्ठ सेवक क्वचितच जन्मला. कडकडीत ब्रह्मचर्याच्या योगाने तो वज्रदेही बनला. वायु किंवा मरुत याचा पुत्र असे मानून त्याला मारुती असेही म्हणतात. त्याला रुद्राचा अवतार मानतात. मारुतीची मंदिरे कन्याकुमारीपासून हिमा-लयापर्यंत पसरलेली आहेत. दक्षिण भारतात मारुतीचे मंदिर नाही असे एकही खेडे सापडणार नाही. शिवाजी महाराजांनी ज्या ज्या ठिकाणी किल्ले बांधले तिथे हातात गदा घेतलेला बल्भीम त्यांनी उभा केला. समर्थांनी पण ११ मारुती मंदिरे स्थापन केली.

चित्रकुट पर्वतावर सदेह विराजमान झालेला हा पवनकुमार, भक्तांची पुकार ऐकताच क्षणातच धावत येतो. स्वार्थत्याग, अलोट धैर्य व सामर्थ्य याचा मूर्तिमंत पुतळा म्हणजे मारुती. हा बळाचा आदर्श आहे तो जितेंद्रिय व संयमी होता.

**वैशाख पौर्णिमा-बुद्ध जयंती**-भगवान बुद्धाचा जन्मदिवस. तथा ज्ञानदिन निर्दोष पशुपक्ष्यांची हत्या बंद करणारा! प्राणीमात्रावर दयेचा पाझर निर्माण करणारा बुद्धदेव म्हणजेच भगवान विष्णुचा नववा अवतार! बुद्ध धर्मात देखील प्रत्येक पौर्णि-मेचे महत्त्व आहे. शिवाय कूर्म अवतारदेखील याच दिवशी झाला.

**ज्येष्ठ पौर्णिमा-वटपौर्णिमा**-अखंड सौभाग्य मागणाऱ्या स्त्रिया याच दिवशी मनोभावे वटवृक्षाची पूजा करतात. अधिक महत्वाचा दिवस म्हणजे सिद्धी महात्मा व ज्ञानी महापुरुष श्रीकबीरसाहेबांचा जन्मदिवस देखील हाच आहे.

**आषाढी पौर्णिमा-गुरुपौर्णिमा**-या दिवशी चंद्रिका स्वतःचे मुख अगदी लाजऱ्यासारखे करून पारदर्शक वादळी ढगाने ( साडीने ) वारंवार झाकीत असते. तर पुन्हा डोकावून पाहिल्यासारखे करते. खरोखर या रात्रीचे दृश्य मनाला मुग्ध करते. सारखे पाहात राहावे असे वाटते. या पौर्णिमेस व्यास पौर्णिमा असेही म्हणतात.

**श्रावणी पौर्णिमा-राखी पौर्णिमा**-या दिवशी नवीन उज्ञोपवीत धारण करतात. ब्राह्मणवर्ग मंत्रोच्चार करून नवी जानवी परिधान करतात. शिवाय बहीण-भावाचे अतुट प्रेमाचे प्रतिक म्हणून बहिण सख्या भावाला तथा धर्माचा मानलेल्या भावाला राखी बांधते. सागरी व्यवसाय करणारे कोळी लोक याच दिवशी सागराला नारळ अर्पण करून आपले व्यवहार सुरू करतात.

**भाद्रपद पौर्णिमा-अनंत पौर्णिमा**-या दिवसानंतर पितृपक्ष तथा श्राद्ध पक्षाच्या प्रथम दिवसापासून स्वर्गस्थ पितरांना पिंडदान अर्पण करतात याला श्राद्ध पक्ष असे म्हणतात.

बादशाह औरंगजेबने आपल्या वडिलांना ( शहाजहान ) कैद करून अन्न पाण्या विना तडफडत राहावे लागले त्यावेळी शहाजहानने औरंगजेबला संदेश पाठविला होता. हिंदु लोक तर स्वतःच्या मृत पितरांनादेखील भोजन-पाणी अर्पण करतात, तेव्हा तू मात्र तुझ्या या पित्याला जिवंतपणी अन्न पाण्याविना तडफडत ठेवले आहे.

**आश्विनी पौर्णिमा-शरद पौर्णिमा**-नवरात्रीच्या उत्सवानंतर येणारी पौर्णिमा, कोजागिरी पौर्णिमादेखील म्हणतात. शक्तीप्रदेश, बंगाल, ओरिसा, आसाम वगैरे प्रांतांत या दिवशी महालक्ष्मीची पूजा करतात.

भगवान बाळकृष्ण गोपीबरोबर दिव्य रासक्रिडा खेळले होते. या रात्री साखर मिश्रित दूध पोहे प्रसाद म्हणून खातात. एकमेकांनाही देतात. पूर्ण चंद्रप्रकाश ज्या ठिकाणी असेल अशा ठिकाणीं ताटामध्ये बारीक पिठी साखर ठेवून रात्रभर चंद्रकिरणाचे अमृत सिंचन होते. या साखरेचा उपयोग केल्याने तनमनाला शीतलता आणि शांति मिळते.

**कार्तिकी पौर्णिमा-देव दिवाळी, त्रिपुरी पौर्णिमा** असेही म्हणतात. तुळशी विवाह झाल्यानंतर लग्नाचा मोसम सुरू होतो.

**मार्गशीर्ष पौर्णिमा-श्रीदत्तजयंती**-या दिवशी भगवान श्रीगुरु दत्तात्रय जयंति साजरी केली जाते.

**पौष पौर्णिमा**-या दिवशी सर्व शक्तीशाली अशा महा अंबादेवी जयंती उत्सव. देवीची यात्रा वगैरे भरते.

**माघी पौर्णिमा**-या पौर्णिमेला कोणी वसंत पौर्णिमा म्हणतात. योगी पुरुष या पौर्णिमेला सारी रात्र जागरण करून ध्यानस्थ बसतात.

**फाल्गुन पौर्णिमा**-कोणी हुताशनी पौर्णिमा म्हणतात. होळी हा शब्द सर्व परिचित आहे. या दिवशी चैतन्य महाप्रभूचा जन्म झाला.

## —० योग्य जोड्या लावा ०—

| | |
|---|---|
| १) २ एप्रिल १९१४ | अ) बाबांनी देह ठेविला |
| २) १५ ऑक्टोबर १९१८ | ब) बाबांनी ब्रह्मांडी प्राण चढविला |
| ३) १० डिसेंबर १९०९ | क) हेमाडपंतांचा मृत्यू |
| ४) २ नोव्हेंबर १९०९ | ड) वाघाने बाबांसमोर प्राण सोडला |
| ५) ९ ऑक्टोबर १९१८ | इ) बाबांचे दिक्षीतांना प्रथम दर्शन झाले |
| ६) १० डिसेंबर १९१० | फ) बाबांनी देवांना स्वप्नात पोथी समजते का विचारले. |
| ७) १५ जुलै १९२९ | ग) दिक्षीत वाडा गृह प्रवेश |
| ८) रामनवमी १९११ | ह) चावडीत बाबांचे भजन पूजन सुरू झाले. |
| ९) मार्गशिर्ष पौर्णिमा १८८६ | ल) दिक्षीत वाड्याची पायाभरणी |
| १०) श्रावण शके १८३४ | म) निंबवृक्षाखाली बाबांच्या पादुकांची स्थापना झाली. |

उत्तर : १) फ २) अ ३) ह ४) इ ५) ड ६) ल ७) क ८) ग ९) ब १०) म

**—श्री. माधव गजानन गोरे**
विनायक बाग, बालाजी मंदीर मार्ग,
कुर्ला (पश्चिम) मुंबई ४०००७०

# आम्हाला बाबांचाच आधार

—डॉ. इंदूताई नाईक
सीताकुंज, लोनावळा

● चंद्र, तारका, पृथ्वी, सूर्य, मंगळ वगैरेसारखे लहान मोठे ग्रह एकमेकांच्या आधाराने ह्या विश्वात भ्रमण करीत आहेत. सृष्टीत असणारी दृष्टीस दिसणारी प्रत्येक वस्तू कुणाच्या ना कुणाच्या आधारावर दिसत आहे.

गवत झाडे झुडपे जमीनीत खोलवर आपली मूळे जाऊ देणार नाहीत तर ती उभीच राहू शकणार नाहीत, वेलींना झाडाचा आधार हवा असतो. जमीनीत खोल खड्डा करून त्यात जमिनीतील झऱ्याचे पाणी साठविल्याशिवाय विहीर आली नसती, समुद्राला देखील आपल्यासाठी जमीनीचा आधार घ्यावा लागतो. पाणी ठरावीक बांधामधून वहाणार नाही तर त्याला नदी कोण म्हणणार ? जर सूर्यचंद्र आपआपल्या गतीने मनाला लागेल तसे फिरू लागले तर प्रलय होईल. त्यांना सुद्धा एकमेकांच्या आधाराशिवाय अस्तीत्व नाही.

पृथ्वीवरील प्रत्येक जीव देखील गुरुत्वाकर्षणामुळेच उभा आहे. सर्व जीव सृष्टीचा पायाच जर आधाराशिवाय नाही तर आम्हा प्रांपचीकाना सुद्धा आलेल्या अडचणीत कुणाचा तरी आधार घ्यावा लागतोच.

साईबाबांची भक्ती ही आम्हा प्रापंचीकांची महान शक्ती आहे. आम्हा साई भक्ताना आमच्या साई माऊलीचा फार मोठा आधार वाटतो. जीवनातील चढ उताराना तोंड देता देता प्रत्येक जीव हैराण होतो. प्रत्येक प्रापंचीकास अनेक समस्याना तोंड द्यावे लागते. अशावेळी तन मन बाबांकडे धाव घेते.

एरवी मोठमोठ्या गप्पा मारणारे बालक घाबरुन ज्या प्रमाणे आईडेक धाव घेते त्याप्रमाणे आम्ही बाबांची सर्व बालकें प्रपंचातील अडीअडचणीला बाबांकडेच धाव घेतो. त्यांच्या पुढे आमच्या समस्या मांडतो, हट्ट करतो, भांडतो, पण त्यांचा पदर सोडत नाही. पाठीत धपाटा बसला तरी खाऊ घेतल्याशिवाय बालक आईचा पिच्छा सोडत नाही. तद्वत आम्ही देखील बाबांपुढे असाच हट्ट धरतो व नामस्मरणाने त्यांना हाक मारतो पण त्यांना सोडीत नाही व सोडणार नाही.

त्या हट्टी बालका प्रमाणेच आम्ही बाबांची लेकरं त्यांच्या आशिर्वादाचा प्रसाद मिळाल्याशिवाय खूष नसतो. शिर्डीस जावे, समाधी स्पर्श करावा, बाबांना डोळे भरून पहावे, ते रुप हृदयात साठवावे. बाबांना पाहिल्यावर तीर्थ प्रसाद घेतल्यावर कोण आधार वाटतो ते सांगणे अगर वर्णन करणे शक्य नाही साखरेची गोडी वर्णन करून काय समजणार! ती अनुभवावी लागते.

बाबांच्या आशिर्वादाचा आनंद प्रत्येकाला शिर्डीसच जाऊन घ्यावा लागतो असे नाही. तर पूर्ण श्रद्धेने हाक मारा ही माय माऊली आपल्या लेकरासाठी धाऊन आल्या शिवाय रहाणार नाही. तुमची हाक प्रेमाने, पूर्ण श्रद्धेने व विश्वासाने हवी बाबांचे आशिर्वाद सदैव तुमच्या पाठीशीच असणार हा अनुभव माझाच नाही तर आम्हा सर्व प्रपंच्यात गोंधळलेल्या साई भक्तांचा आहे.

शिर्डी माझे हृदयात असे,
सदा सर्वदा साई दिसे:

★

# संत गजाननबाबा व संत साईबाबा एकच अवतार

—श्री. लक्ष्मण बापूराव रापतवार
किल्ला वॉटर वर्क्स, नांदेड

● परमेश्वर एकाचवेळी अनंत रुपे धारण करून जगाचे कल्याण करीत असतो हे संत ज्ञानेश्वर माऊली, संत एकनाथ महाराज, संत नामदेव व भक्त कबीर यांच्या चरित्रावरून सिद्ध होते. त्याचप्रमाणे एकाच काळी संत गजानन महाराज वऱ्हाड प्रांती शेगावात तर संत साईबाबा शिरडीत ऐन तारुण्य अवस्थेत प्रगट झाले. ह्या दोन्ही संतांची नाव, गाव, जात, धर्म, याचा अद्यापपर्यंतही शोध लागलेला नाही. परमेश्वरास कोणती जात असू शकणार! लोकांनीच त्यांना आपआपल्या इच्छेनुसार व प्रेरणे प्रमाणे नाव दिले. जगाच्या कल्याणाचे कार्य करण्यासाठी ह्या दोन्ही संतांचे आगमन पृथ्वीवर झाले. लोकांना परमेश्वराच्या भक्तीस लावावे. त्यांच्यात जे अवगूण

आहेत ते नाहीसे करावे. सर्वांभूती समान दृष्टी ठेवावी. मोह, माया, काम, क्रोध लोभ ह्या प्रापंचीक जाळ्यातून लोकांची मुक्तता करावी हे शिकवण्या करताच अवतारी पुरुष जन्मास येत असतात.

दोघाही संतांमध्ये बरीच समानताही आढळून येते. ज्याप्रमाणे साईबाबांनी नुसता चिमटा जमीनीवर आपटून अग्नी प्रकट केला व चिलीम पेटवीली त्याचप्रमाणे संत गजानन महाराजांनी नुसतीच काडी वर धरून चिलीम पेटविली, ज्यामुळे चांद पटेल साईबाबांचे तर बंकटलाल गजानन महाराजांचे निस्सीम भक्त बनले. गजानन महाराजांनी कोरड्या विहीरीस अकोलीच्या गावी पाण्याने तुडुंब भरले व अकोली गावच्या सर्व लोकांना सन्मार्गी लावले त्याचप्रमाणे साईबाबांनी नुसत्या पाण्यानेच पणत्या पेटवून प्रज्वलीत केले त्यामुळे शिर्डी गावचे सर्व लोक त्यांचे भक्त बनले, व ह्या प्रकारे दोन्ही संतांचा अधिकार त्याना माहीत झाला. ह्या दोन्ही संतांची प्रभू-सत्ता समजल्याबरोबर लोक दर्शनाकरता धावून आले परंतु त्यांनी कोणासही आपण अवतारी पुरुष आहोत हे समजू दिले नाही. बळेच त्यांनी वेड्याचे सोंग घेतले परंतु जे खरे रत्नपारखी असतात ते ह्या रत्नांना कसे सोडू शकतील म्हणून काही विशिष्ट भक्तांचा जमाव दोन्ही संतांच्या भोवती होऊ लागला ज्याची कथा 'श्री गजानन विजय' व 'श्रीसाई सचरित' ह्या ग्रंथामध्ये दिली आहे.

ह्या दोन्ही संताच्या समानते बद्दल व भक्तवत्सल परमेश्वर भक्त रक्षणा करता कसा धावून जातो ह्याची प्रचीती यावी म्हणून खालील कथा भाग वाचका करता नमूद करीत आहे.

जे साई भक्त आहेत त्यांना माहित असेलच की नानासाहेब चांदोरकर हे साईबाबांचे निस्सीम भक्त होते. ते खानदेशात जामनेर गावी मामलेदार असताना त्यांची मुलगी मैनाताई बाळंतपणाकरता आली असता तीन दिवस पर्यंत ती अडून राहिली काही केल्या सुटका होईना. नानासाहेब व त्यांच्या पत्नीने बाबांचा धावा सुरु केला. सर्वज्ञ बाबास शिरडीत सर्व काही दिसतच होते. त्याच वेळी दर्शना करता रामगीर बुवा आलेला गृहस्थ शिरडीहून खानदेशाला जाण्या करता निघाला तेव्हा बाबांनी त्यास जामनेरला थोडावेळ उतरून ऊदी आणि आरतीचा कागद चांदोरकरांना देण्याची आज्ञा दिली. रामगीर बुवांनी आपल्या जवळ फक्त दोनच रुपये शिल्लक आहेत ते मला जळगाव पर्यंत जावयास लागतील म्हणून नम्रपणे सांगितले असताच बाबांनी त्यास तू काही काळजी करू नकोस सर्व व्यवस्था होईल म्हणून सांगितले. तो बाबांची आज्ञा शिरसावंद्य माणून जळगाव स्टेशनवर उतरला तेव्हा त्यास एका अनो

भाऊ कवर बरे झाले ते शेगावी गजानन महाराजांच्या दर्शना करता गेले तेव्हा महाराज वडील भावास म्हणाले की माझ्या बैलाला त्वा चाराही दिला नाही. तेव्हा डॉक्टर कवर व त्यांच्या भावास खूण पटली की गजानन महाराज स्वतः ब्राम्हण वेशात धमणीत बसून आले होते. त्यांचे हृदय उचंबळून आले व डोळ्यातून आनंदाश्रूंच्या धारा वाहू लागल्या.

अशा रितीने संत साईबाबांनी व संत गजानन महाराजांनी आपल्या खऱ्या भक्तांच्या रक्षणा करता धावा घेतला व त्यांचे प्राण वाचविले. ते सर्व साक्षी, सर्वज्ञ होते. ते परमेश्वराचेच अवतार होते हे अगदी स्पष्ट आहे.

●

# श्री साईबाबा दत्तावतारच

—श्री. रामचंद्र दशरथ खेले
१७४६ (नवा) शुक्रवार पेठ
जेधे प्रासाद रस्ता पुणे नं. २

● श्री साईबाबा हे दत्त अवतार आहेत असे सर्वत्र मानले जाते. त्याला पुरावा मी वाचलेल्या श्री संत सकल गाथा या ग्रंथावरून खास असावा याची मला वाचण्याच्या आधीपासून कल्पना होती. तरी ज्या कोणी श्री संत सकल गाथा वाचली नसेल त्यांनी पान ८ व ९ हे वाचले तर त्यांची मनिषा पूर्ण होईल. मी तर साईचा भक्त आहे, मला या जाणिवेची जरुरच नव्हती. तरी इतर भक्ताकरिता सोबतचा लेख देत आहे. म्हणजे श्री दत्त व साईबाबा हे एकच आहेत दोन नव्हेत असे भक्ताने समजावे. मलंग म्हणजेच फकीर वेषातील साईबाबा.

श्री एकनाथ महाराजांचे गुरु जनार्दन स्वामी हे देवगिरी उर्फ दौलताबाद किल्ल्यावर अधिकारी होते. दौलताबाद गडाचे उत्तरेस एक एकांत स्थान होते. त्या स्थानाला कोणी फिरकत नसे. श्री दत्त महाराज सगुण रुपाने येऊन तेथे स्वामींना दर्शन देत. आणि त्यांच्याशी बोलत असत. त्या शुक्रवारी स्वामींनी नाथांना बरोबर घेतले, आणि ते निघाले. श्री दत्त महाराजाशिवाय इकडे कोणी फिरकत नाही. ते

ळखी माणसाने शिरडीचा रामगीर बुवा कोण आहे म्हणून विचारले. मला नानासाहेबांनी टांगा देऊन पाठविले आहे म्हणताच रामगीर बुवा टांग्यात बसले. टांगा भरधाव सुटला रस्त्यात फराळ पाणी सुद्धा रामगीर बुवाचे झाले. जामनेर गावा जवळ जाताच रामगीर बुवास लघूशंका आली ते खाली उतरले व परतून आले तर तेथे टांगाही नाही व टांगेवाला गढवाल क्षत्रीय मिशा दाढीवालाही नाही. तेव्हा ते तसेच विचारीत विचारीत चांदोरकरांच्या घरी पोहचले व साईबाबांनी उदी व आरती आपणास देण्या करता पाठविले म्हणताच त्यांच्या डोळ्यातून आनंदाश्रु वाहू लागले. मुलीस पाण्यात मिसळून उदी पाजली व आरती म्हणण्यास सुरवात करताच मैनाताई सुखरूप प्रसूत झाली सर्वांच्या डोळ्यातून हा चमत्कारी प्रकार पाहून आनंदाश्रू वाहू लागले. रामगीर बुवा नानासाहेबास म्हणाले की आपण योग्य वेळी टांगा व मनुष्य पाठविलात म्हणून मी अगदी वेळेवर येथे पोहचू शकलो. हे रामगीर बुवांचे बोलणे ऐकून नानासाहेब बुचकळ्यात पडले कारण त्यांनी कोणासही स्टेशनवर पाठविलेले नव्हते व रामगीर बुवा बद्दल त्यांना कल्पनाही नव्हती. नंतर सर्व माणसांनी टांग्याचा व त्या गढवाल क्षत्रीय माणसाचा खूप शोध घेतला परंतु काहीच पत्ता लागला नाही. कारण साईबाबाच प्रत्यक्ष आपल्या भक्तावरील संकट निवारण करण्या करता टांगेवाल्याच्या रुपाने तेथे प्रकट झाले होते. "देव स्वतः भक्ताचे रक्षण करण्या करता धावत येतो" हे या उदाहरणा वरून सिद्ध होते.

अशाच प्रकारची कथा संत गजानन महाराजांची आहे. त्यांचा एक निस्सीम भक्त डॉक्टर भाऊ कवर नामी खामगावास नोकरीस होता. त्याला एक फोड झाला होता. स्वतः डॉक्टर असल्यामुळे बराच इलाज केला नंतर मोठ्या तज्ञ डॉक्टराकडून तपासणी करून शस्त्रक्रीया करण्यात आली. नाही ती औषधी देण्यात आली परंतु काहीच आराम पडेना वरचेवर फोड वाढूच लागला व त्याच्या वेदना भाऊ कवर यास असह्य होऊ लागल्या त्याच्या वडील भावास फार चिंता लागली व वारंवार हात जोडून सद्गुरु गजानन महाराजास प्रार्थना करू लागला की हे गजानना आता तुज वाचून माझ्या भावास कोणीही वाचवू शकणार नाही अशी एक सारखी करूणा भाकीत होता व देवा आता अंत पाहू नकोस लवकर धाव म्हणीत रडत बसला. रात्री दोनच्या सुमारास एकसारख्या जाग्रणा मुळे त्यास झोप लागली तेव्हा दवाखान्यात एक घमणी आली. त्यातून एक ब्राह्मण उतरला त्याने दारास ठोठावले. भाऊ जागा झाला. ब्राह्मणाने हा गजानन महाराजांचा अंगारा व तीर्थ घ्या म्हणून दिले व मला वेळ नाही म्हणून अदृश्य झाला. अंगारा फोडास लावताच फोड फुटला पू निघून गेला माणसानी घमणीचा व ब्राम्हणाचा खूप शोध घेतला परंतु पत्ता लागला नाही. खऱ्याभक्ताच्या रक्षणा करता देव शेगावहून स्वतः धावून आले होते त्यांचा शोध कसा लागू शकणार! डॉक्टर

कोणत्या रुपात येतात याचा नेम नाही तरी तू भिऊ नकोस. असे स्वामींनी एकनाथास बजावून ठेवले होते.

एका शिलाखंडावर बसून स्वामींनी ध्यान धरले. इतक्यात एक मलंग तेथे आला. देह मलीन, अंगावर कातडे पांघरलेले, हातात कटोरा आणि बरोबर एक कुत्री असा त्यांचा वेष होता. तो दिसताच स्वामींनी धावत जाऊन त्यांचे पाय धरले, मलंगाने त्यांना उठवून प्रेमाने आलिंगन दिले, नंतर दोघे एकाच आसनावर बसून गोष्टी करीत राहिले. थोड्या वेळाने मलंगाने जवळचा कटोरा स्वामींना दिला आणि त्यांना आज्ञा केली. जा, त्या कुत्रीची धार काढून आण. स्वामी लगेच उठले. आणि त्यांनी कटोराभर दूध काढून आणले. मलंगाने आपल्या झोळीतील शिळया भाकरीचे तुकडे काढले आणि ते त्या दुधात कुसकरले. नंतर मिटक्या मारीत ते दोघेही एकाच कटोऱ्यात खाऊ लागले. भोजन संपल्यावर त्यांनी तो कटोरा धुण्याकरिता एकनाथाकडे दिला. नाथ तो कटोरा घेऊन तळयावर गेले. आपले गुरु एवढे कडकडीत सोवळे पाळणारे असून या मलंगाबरोबर उष्टे खातात, तेव्हा हा काही निराळा प्रकार असावा असे मनात आले, त्यांनी कटोरा पाण्यात बुडविताच अन्नाचे काही कण वर तरंगू लागले. तेव्हा हाच महाप्रसाद असे समजून त्यांनी ते पाणी पिऊन टाकले. नंतर कटोरा स्वच्छ धुवून मलंगापुढे नेऊन ठेवला. एकनाथाचा भाव मलंगाने जाणून तीन शिरे सहा हात असा तो दत्तात्रय रूप घेऊन प्रगट झाला. त्या कुत्रीची कामधेनू झाली. श्री दत्तांनी एकनाथाकडे प्रेमभराने पाहिले. आणि त्यांना हृदयाशी धरून ते म्हणाले, 'जनार्दना तुझा शिष्य मोठा पुरुष आहे.'

★

# श्रीबाबा व नाना चांदोरकर
# देव आणि भक्त (संवाद)

—सौ. उषा प्रभाकर अधिकारी
सावित्री सदन, बंदर रोड, रत्नागिरी

● नानासाहेब चांदोरकर हे बाबांचे परमभक्त. आदरणीय वागणूक, नम्रपणा आणि बहुश्रुत व विद्वान असलेल्या नानांविषयीं श्रीबाबांना विशेष प्रेम वाटे. त्या प्रेमापोटीच अप्पा कुळकर्णी मार्फत नानांना आपलेकडे बोलावून घेतले. त्यांच्या अडचणीच्या वेळी स्वतः धाव घेऊन त्यांच्या कन्येची सुखरुप सुटका केली. नाना आणि श्रीबाबा यांचे अनेक वेळा संभाषण होई. नाना श्रीबाबांना अनेक शंका विचारीत त्यांचे समाधान करता करता बाबा असे काही बोलून जात की तो उपदेश सर्वांनीच आचरणात आणावा. याचे एक उत्तम उदाहरण म्हणजे श्रीबाबांनीच सांगितलेला स्त्रियांचा धर्मपती हा स्त्रीचा देव आहे, प्रत्यक्ष श्रीहरीच्या ठिकाणी आपल्या पतीला मानून त्याची सेवा करावी. त्याच्या ठिकाणी शुद्ध भाव ठेऊन आनंदात राहावे. प्रपंचात पतीला योग्य ती साथ द्यावी. त्याचे मन दुखित ठेऊन कोणतेही व्रत करू नये. अशी जी वागेल (पतीच्या विरुद्ध) ती स्त्री पापी, कुलटा समजावी. स्त्रियांनी विनयशील असावे. इतर कोण जवळ नसेल तर परपुरुषाशी बोलू नये, छचोर चाळे करू नयेत. प्रत्यक्ष आपला भाऊ असला तरी तो दुसरा पुरुष आहे म्हणून त्याच्याशीही एकांतात राहू नये आपल्या पतीवाचून अन्य कुणाचे स्मरण करू नये. मुलांचे संगोपन उत्तमप्रकारे करावे. मुले सन्मार्गप्रत व्हावी म्हणून त्यांना चांगल्या चांगल्या गोष्टी सांगून त्यांना शिक्षण द्यावे. आपले सासू–सासरे, दीर, जावा नणंदा यांचेविषयीं प्रेम धरावे, कधीही द्वेष करू नये. सवत असल्यास तिच्यावरही प्रेम करावे. पतीचा विचार घेऊनच एखादे व्रत करावे. आपले गुण असे असावेत की चारचौघांनी त्याची वाखाणणी केली पाहिजे.

विधवानी कसे वागावे याचाही सुंदर उहापोह श्री बाबांनी केला आहे. देह प्रारब्धाने वैधव्य आलेच तर नशिबाला दोष न देता परमेश्वरावर भार ठेऊन कडकडीत ब्रह्मचर्य पाळावे. वैधव्य आलेच तर मऊ गाद्या गिरद्यांवर झोपू नये. अंगाला सुगंधी उटणी लावू नयेत. साधे अन्न खावे. शक्यतो एकभुक्त राहावे एकादशीसारखे उपवास करावेत व नित्य परमेश्वराचे स्मरण करावे आध्यात्मिक वाचन करावे, श्रवण मनन करावे पोथ्या वाचाव्यात पुराणे वाचावीत. विधवा स्त्रीने संन्यस्त वृत्तीने वागावे

षड्रिपूंना आपल्या ताब्यात ठेवावे. असे वागले असता बद्धस्थिती दूर होते. बद्ध-स्थिती दूर होते हे ऐकल्यावर नानांनी त्या स्थितीविषयी विचारले त्यानंतर श्रीबाबांनी नानासाहेबांना बद्धस्थितीची लक्षणे सांगितली आहेत ती पुढीलप्रमाणे—

१ **बद्धस्थिती**–जो माणूस धर्म आणि अधर्म जाणत नाही, ईश्वर आहे असे मानत नाही, ज्याच्या मनात कधीही चांगल्या वासना निर्माण होतच नाहीत तो बद्ध होय. जो स्वतः कपटी आहे, नेहमी कटू बोलून दुसऱ्याचे अंतःकरण दुखावणारा आहे नित्य पापकर्मेच करतो, साधुसंतांचा अवमान करतो, स्वतःच्या संसारात गुरफटून राहातो तो बद्धच. जो कधीही दानधर्म करीत नाही, पोकळ वितंडवाद करतो, दुसऱ्याची ठेव बुडवून स्वतःचा स्वार्थ साधतो, परक्यांची निंदाच करतो तोही बद्धच. आपला मोठेपणा वाढण्यासाठी जो इतरांना दूषण देतो, वरवर साधुपणाचे सोंग घेतो पण अनीतीने वागतो, जो मित्रद्रोही आहे, गुरुनिंदक आहे ज्याचा महाकाव्यावरही विश्वास नाही, ज्याने पुष्कळ ग्रंथ वाचले आहेत, पाठांतर केले आहे पण ज्याचे अंतःकरण शुद्ध नाही तो बद्ध जाणावा. अशा माणसाला सत्संगती घडत नाही, मोक्ष मिळत नाही उलट यमयातना भोगायला यमलोकीच जावे लागते.

यावर नानांनी श्रीबाबांना प्रश्न विचारून मुमुक्षूंची लक्षणे सांगा अशी विनंती केली. श्रीबाबांनी मोठ्या आनंदाने नानांना ती स्पष्ट करून सांगितली आहेत.

२ **मुमुक्षू**–जो बद्धस्थितीला कंटाळला आहे, जो सद्विचार जाणतो आणि देव कधी भेटेल याची तळमळ लागून प्रतिक्षा करतो तो मुमुक्षू. जो नेहमी सत्संगतीच करतो, प्रपंचाचा वीट येऊन जग निःसार मानतो तोही मुमुक्षूच. देहप्रारब्धानुसार जी स्थिती प्राप्त झाली असेल त्यात आनंद मानून राहातो तो मुमुक्षूच. ज्याला पापाची भीती वाटते, जो असत्य भाषण करीत नाही, चुकून घडलेल्या पापाचरणाचा, कृत-कर्माचा ज्याला पश्चात्ताप खरोखरच झाला असेल तर तो पतीत असला तरी तोही मुमुक्षूच. ज्याला देवाविषयी प्रेम आहे, साधुसंतांविषयी आदरभाव आहे, जो नीतीचा भोक्ता आहे तो मुमुक्षूच.

श्रीबाबांचे एकेक बोल ऐकून नानासाहेबांचे चित्त प्रफुल्लीत झाले, जिज्ञासा तीव्र झाली आणि साधक कुणाला म्हणावे ! असा प्रश्न त्यांनी अति विनयाने विचारला. यावर श्रीबाबांनी अतिशय प्रेमभावाने त्यांची जिज्ञासातृप्ती केली आहे.

३ **साधक**–जो क्षणभरही सत्संग सोडून राहात नाही, केवळ हरिनाम गाण्यातच जो तल्लीन झाला आहे, विषय ज्याला विषासमान वाटतात, अध्यात्मविद्या प्राप्तीसाठी

जो सतत प्रयत्नशील आहे तो साधक. एकांतात राहून जो ईश्वराचे स्मरण करतो ध्यान करतो तो साधकच होय. हरीचे गुणगान ऐकून ज्याचे मन आनंदित होते, शरीरावर रोमांच उठतात, कंठ दाटून येतो तोही साधकच होय. जननिंदेची पर्वा न करता जो अखंड श्रीहरीचे नामस्मरण करतो, जो साधुसंतांची निरलसपणे सेवा करतो तोही साधक.

श्रीबाबांनी बद्ध, मुमुक्षू व साधक यांची लक्षणे सांगितली तरी सिद्धाची लक्षणे· ही सांगावीत आणि आपणासाठी जी पंचपक्वानांची मेजवानी केली आहे त्याची सांगता करावी अशी नानांनी प्रेमळ मागणी केली. आपल्या प्रेमळ भक्तांचे लाड पुरवायला बसलेली साईमाऊली त्यांना नकार कशी देईल ! त्यांनी सिद्धाची लक्षणेही विषद केली.

**४ सिद्ध**–निंदा आणि स्तुती, मान आणि अपमान, जन आणि जनार्दन यांना सारखेच समजणारा तो सिद्ध. षड्रिंपूवर ज्याने पूर्ण विजय मिळवून त्यांना आपल्या ताब्यात ठेवले आहे, जो स्थिर विचारांचा आहे तो सिद्ध. ज्याच्याजवळ संकल्प विकल्पांना जागा नाही मी तू पणाची भावना नाही, ज्याला देहाची पर्वा नाही, जो सुख दुःखाचा विचार करीत नाही, ज्याच्यावर त्यांचा परिणामही होत नाही इतकेच नव्हे तर 'मीच ब्रह्म आहे' असे ज्याला वाटते तो सिद्ध होय.

श्रीबाबांनी ह्या ज्या ४ स्थिती सांगितल्या त्याचा पूर्ण विचार करून प्रत्येकाने वागावे. त्यातच आपले हित आहे.

(अर्वाचीन भक्त श्री. दासगणूकृत व संत लीलामृत यांच्या आधारे)

★

# श्रीसाई बाबांवर प्रकाशित

| क्रमांक | मासिकाचे नाव | कोणत्या भाषेत | वार्षिक वर्गणी |
|---|---|---|---|
| १ | श्रीसाईलीला | इंग्रजी-हिंदी आवृत्ती<br>मराठी आवृत्ती | १० रु.<br>१० रु. |
| २ | श्रीसाईकृपा | इंग्रजी-हिंदी | १० रु. (तिमाही फक्त ४ अंक) |
| ३ | साईसुधा | इंग्रजी-तामीळ-तेलगू | ७ रु. वार्षिक |
| ४ | साईसुमन | गुजराथी | १० रु. वार्षिक |
| ५ | श्रीसाई समाज | इंग्रजी | ५ रु. वार्षिक |
| ६ | साई संदेश | इंग्रजी मासिक | १२ रु. वार्षिक |
| ७ | श्रीसाई वाणी | इंग्रजी-हिंदी | १० रु. वार्षिक |

# सोळा अवतारी श्री गुरुदत्तात्रेय

—संग्राहक : गौरूराम गोविंद उरणकर
मु. पो. पनवेल ता. पनवेल
जिल्हा रायगड ४१०२०५

१) श्री दत्तात्रयाने कार्तिक शुद्ध पौर्णिमा या दिवशी 'योगीराज' या नावाने पहिला अवतार घेतला. २) कार्तिक वद्य प्रतिपदेस 'अत्रिवरद' या नावाने दुसरा अवतार घेतला. ३) दत्तात्रयाने तिसरा अवतार 'श्री दत्तात्रेय' या नावाने कार्तिक वद्य द्वितीयेस घेतला. ४) मार्गशीर्ष शुद्ध पौर्णिमेला 'काला अग्निशमन' या नावाने चौथा अवतार घेतला. ५) पाचवा अवतार 'योगिजन वल्लभ' या नावाने ओळखला जातो. ६) सहावा अवतार पौषशुद्ध पौर्णिमेला 'लीला विश्वंभर' या नावाने दत्तात्रेयाचा अवतार आहे. ७) सद्गुरू भगवान दत्तात्रेयाचा सातवा अवतार 'सिद्धराज' या नावाचा असून तो माघ शुद्ध पौर्णिमेला घेतला आहे. ८) दत्तात्रयांनी फाल्गुन शुद्ध दशमीला 'ज्ञान सागर' या नावाने भक्त जनांच्या कल्याणासाठी आठवा अवतार घेतला आहे. ९) विश्वाच्या उत्पत्तीच्या स्थितीचे आणि लयाचे अधिष्ठान मीच आहे हे दाखविण्यासाठी नववा अवतार घेतला. १०) 'मायामुक्तावधूत' या नावाने वैशाख शुद्ध चतुर्दशीस श्री दत्तात्रेयानी दहावा अवतार घेतला. ११) श्री दत्तात्रेयाचा अकरावा अवतार 'मायामुक्त अवधूत' या नावाने आहे तो जेष्ठ शुद्ध त्रयोदशीस घेतला. १२) **आषाढ शुद्ध पौर्णिमेला दत्तात्रयांनी 'आदी गुरू' या नावाने बारावा अवतार घेतला असून ही पौर्णिमा म्हणजे गुरू पौर्णिमा सर्वत्र ओळखली जाते**. १३) दत्तात्रेयाचा तेरावा अवतार 'शिवरूप' या नावाने ओळखला जात असून तो श्रावण शुद्ध अष्टमीला घेतला. १४) चवदावा अवतार 'देवदेवेश्वर' या नावाने भाद्रपद शुद्ध चतुर्थीला घेतला. १५) दत्तात्रेयांनी आश्विन शुद्ध पौर्णिमेला 'दिगंबर अवधूत' या नावाने पंधरावा अवतार घेतला. १६) श्री सद्गुरू दत्तात्रेयाचा सोळावा अवतार कार्तिक शुद्ध द्वादशीस 'श्री कृष्णश्याम कमळ नयन' या नावाने घेतला आहे.

☆

२२१

# होणाऱ्या नियतकालीकांची सूची व पत्ते

| संपादक | पूर्ण पत्ता |
| --- | --- |
| श्री. क. हि. काकरे | साई निकेतन, ८०४ बी. डॉ. आंबेडकर मार्ग, दादर, मुंबई ४०० ०१४ दूरध्वनी – ४४ ३३ ६१ |
| श्री. आर. एस. चिटणीस | श्रीसाई भक्त समाज, १७ इनस्टीटयूशनल एरिया, लोदी मार्ग, नवी दिल्ली ११ ०० ०३ दिल्ली दूरध्वनी ६२ ६५ १६ |
| श्री. टी. केशवराव | ऑलइंडिया साईसमाज, मैलापूर, मद्रास ६० ०० ०४ |
| श्री. शंकरलाल चोक्सी | साई सुमन कार्यालय, बचुभाई बिल्डिंग, दामोदर हॉल, पोयबावडी परळ मुंबई ४०० ०१२ |
| श्री. आर. सुब्रमणिअम | श्रीसाई समाज, पी ११३ लेकटेरेस, कलकत्ता, ७०००२९ |
| श्री. बशीरबाबा महाराज | दिवर्ल्ड साई प्रचार सभा, श्रीराम साई नगर, ५१६१७५ प्रोड्डाटूर तालुका, जि. कडाप्पा ( आंध्र प्रदेश ) |
| श्रीमती वीणा डी. रावळ | श्री. भगवती साई संस्थान, सी/५५ प्रेम नगर सोसायटी मु. पो. ठाणे ४०० ६०३ |

# भारतातील श्रीसाईबाबांची मंदिरे

(मागील अंकावरून क्रमशः)

[ असंख्य साईभक्तांनी केलेल्या मागणीमुळे मोठ्या कष्टाने व परिश्रमाने संग्रहीत केलेली ही सूची एप्रिल अंकापासून क्रमशः प्रसिद्ध करीत आहोत. आमच्या असंख्य भक्तांना ही सूची नक्कीच संग्राह्य वाटेल. का. सं. ]

४४) श्रीसाईबाबा मंदिर — मु. पो. कुर्नुल (आंध्र प्रदेश)

४५) श्रीसाईबाबा मंदिर — मु. पो. काकीनाडा (आंध्र प्रदेश)

४६) श्रीनागसाई मंदिर — श्रीसाईबाबा मंदिर रोड, मु. पो. कोईमतूर (तामिळनाडू)

४७) श्रीरामसाई मंदिर — श्रीरामसाई नगर, मु. पो. दुब्बुर (आंध्र प्रदेश)

४८) श्रीसाईबाबा मंदिरम् — रेल्वे स्टेशनजवळ, मु. पो. कडाप्पा (आंध्र प्रदेश)

४९) श्रीसाईबाबा मंदिर — मु. पो. भिमावरम् पश्चिम गोदावरी जिल्हा (आंध्र प्रदेश)

५०) श्रीसाईबाबा मंदिर — मु. पो. ढवळेश्वरम्, राजमहेन्द्री (आंध्र प्रदेश)

५१) श्रीसाई मंदिर — मु. पो. जलालपेठ बंदर, मच्छलीपट्टम (आंध्र प्रदेश)

५२) श्री प्रसन्न साई मंदिर — ७४ त्यागराज रोड, मु. पो. म्हैसूर (कर्नाटक)

५३) श्रीसाई मंदिर — फर्न हिल, निलगिरी-उटकमंड जि. कोईमतूर (तामीळनाडू)

५४) श्रीसाईबाबा मंदिर — पिकेटस् मु. पो. सिकंदराबाद (आंध्र प्रदेश)

५५) श्रीसाईबाबा मंदिर (धर्मस्थानम्) — मु. पो. वेंट्रांप्रागदा, गुडीवडा ता. कृष्णा

५६) श्रीसाईबाबा मंदिर — मु. पो. कनिगिरी, जि. नेलोर (आंध्र प्रदेश)

५७) श्रीसाई कुटीरम् — मु. पो. चिन्नागंजम्, जि. गुंतूर (आंध्र प्रदेश)

५८) श्रीसाई मंदिर — मु. पो. रायपल्ली, जि. गुंतूर (आं. प्र.)

—क्रमशः चालू

## बाबांच्या विभूतिमुळे

# मृत वानरी जिवंत झाली !

लेखक : प्रा. ए. पी. त्रिपाठी, एम. ए; 'साहित्यरत्न'
अनुवाद : **प्रा. एच. बी. महाले**, एम. एस. सी.
—ज. ह. शासकीय विद्यालय, बैतुल (म. प्रदेश)

● देवाधिदेव भगवान श्रीसाईनाथांच्या विभूतिमुळे लाखो लोकांना जीवदान मिळाले आहे आणि आजपर्यंतही ती त्याच प्रकाराचं काम करीत आली आहे. याचे ताजे उदाहरण दिनांक ३१ ऑगस्ट, १९८१ ला घडलेल्या एका घटनेने मिळते. त्या दिवशी दुपारी सव्वा दोन वाजता मी कॉलेजमध्ये शिकवून झाल्यावर पायी पायी घरी येत होतो. माझ्या कॉलेजच्याच जवळील चौकात माझे शेजारी एक मुसलमान सज्जन श्री. शेर खाँ एका चपराश्यासी बोलत उभे होते. त्यांची त्यानी पाळलेली एक वानरी त्या चपराश्याच्या डोक्यावर बसली होती. शेर खाँ घरी जायला निघाले आणि त्यांनी त्यांच्या वानरीला स्वतःच्या सायकलच्या हॅन्डलवर बसविले. इतक्यात खाली उडी मारून ती वानरी एका मातीच्या ढिगाऱ्यावर जाउन बसली. त्यांनी सायकल वरूनच जाता जाताच तिला म्हटले, 'चम्पा, चल, घर चले! आंओ!' पण ती वानरी त्यांच्या जवळ न येता एका पंचवीस फूट उंचीच्या विजेच्या खांबावर चढली आणि अगदी वरच्या टोकावर बसून चेष्टा करू लागली. शेर खाँ सायकल थांबवून तिला बोलावू लागले, 'चम्पा, घर चल!' त्यांचे न ऐकता चम्पेने वीजेची तार पकडली आणि आलटून पालटून हात बदलून झोके घेऊ लागली. एकाएकी दुसऱ्या तारेस तिचा स्पर्श होऊन त्यातील जिवंत विद्युत प्रवाहाने ती ताराना चिकटली गेली. तिच्या सर्वांगातून जोरात वीज वाहू लागल्यामुळे काही क्षण चीं चीं चीं करीत आर्त स्वरात किंचाळू लागली. पायही खालच्या तारेला चिकटल्यामुळे क्षणार्धांत तिचे किंचाळणे थांबून ३–४ मिनिटे वरच्या तारेला चिपकून निर्जीव अवस्थेत ती तशीच लोंबकळत राहिली. तिचे हे प्राण समाप्तिचे करूण दृश्य व्यथित अंतःकरणाने जागच्या जागी खिळून मी तसाच पहात राहिलो. तीन चार मिनिटांनंतर तिचे मृतवत शरीर पिकलेल्या आंब्याप्रमाणे पंचवीस फूटावरून धाडकन् खालच्या मातीच्या ढिगाऱ्यावर पडले. खाली आल्यावर चम्पेकडून कोणतीच हालचाल झाली नाही. मी पळतच तिच्याकडे गेलो आणि माझ्या हातातील बॅगमधून माझ्याजवळ सदैव असणारी बाबांच्या विभूतिची डबी काढली. त्यातील थोडी विभूति झटकन् तिच्या उघड्या तोंडात घातली. शिवाय थोडीशी तिच्या कपाळावर आणि डोक्यावरही चोळली. शेर

खाँना मी समोरच्या बंगल्यातून तांब्याभर पाणीही आणण्यास सांगितले. पाणी यायला थोडा वेळ लागला. दरम्यान गतप्राण झालेल्या चम्पेने डोळे उघडले आणि करूण नजरेने ती माझ्याकडे पाहू लागली. तिचे प्राण परत आल्याचे लक्षण पाहून पुन्हा एकदा मी तिला बाबांची विभूति खायला घातली. इतक्यात पाणीही आले. तिच्या तोंडावर व डोक्यावर मी पाण्याचे शिडकावे मारले. तसेच नंतर दातखिळी बसलेला तिचा जबडा परिश्रम पूर्वक उघडून तिच्या तोंडात थोडे पाणीही घातले. थोड्याच वेळात तिची हालचाल सुरू झाली. चम्पा उठून बसली. पण पुढच्या हातानी जेव्हा तिने चालायचा प्रयत्न केला तेव्हा पुन्हा एकदा ती धाडकन तोंडावरच पडली. ज्या हातानी तिने वरची तार पकडली होती ते निष्क्रीय झाले होते. म्हणून पुन्हा एकदा बाबांची विभूति मी तिच्या तळहाताना चोळली. नंतर थोड्याच वेळान शेर खाँनी सायकलवरून तिला घरी नेले.

मीही घरी गेलो आणि शिरडीहून आणलेले साईबाबांच्या समाधिवरील स्नानाचे तीर्थ बरोबर घेऊन शेरखाँच्या घरी गेलो. अभिषेकाचे ते तीर्थ पिताच त्या वानरीनं आपला उजवा हात डोक्याला लावला, आणि तिनं ताबडतोब नाचायला, कुदायला आणि खेळायला सुरवात केली आणि तिचे हात आणि मागचे पायही सक्रीय होऊन त्यात चैतन्य आले होते. शेरखाँना हे सर्व पाहून आनंद झाला. ते म्हणाले आणि आता नेहमीच म्हणतात, 'माझी चम्पा मरून पुन्हा जिवंत झाली आहे!' मी मात्र जेव्हा जेव्हा चम्पाला पाहतो तेव्हा स्मितपूर्वक मनातल्या मनात साईनाथांना नमस्कार करतो. इथं जाता जाता एका गोष्टीचा उल्लेख करणे जरुर आहे की चम्पेला विभूति लावताना साईनामाचा जप चालू ठेवला होता, आणि माझी ठाम समजूत आहे की त्यामुळेच बाबांनी चम्पेला जीवन प्रदान केले होते. बाबांना बोलावताच ते धावले आणि 'जरी हे शरीर गेलो मी टाकून। तरी मी धावेन भक्तांसाठी ॥' या उक्ती-प्रमाणे त्यांनीच तिला यमराजांच्या पंजातून सोडवून आणले होते. चम्पाला वाचा असती तर तिनेच आपल्या परलोक प्रवासाचे खुसखुशीत वर्णन करून श्री बाबांनी यमराजाच्यावर कशी मात केली ते स्वतःच सांगितले असते! असे आहेत आपले श्री साईबाबा!

# श्री गुरुपूजा

आली आली गुरुपौर्णिमा करू या सद्‌गुरु पूजा
जमूनी सारे शिरडीला करू या साईनाथ पूजा ॥ १ ॥

गुरु भेटीला मन आतुरले आतुरले
चिंतनात ते तन मन रंगूनी गेले ॥ २ ॥

आनंदाचा दिन हा सद्‌गुरुची होता भेटी
षडरिपूंची झालीसे ताटातूटी ॥ ३ ॥

लाविल्या समया चमकती हे लामण दिवे
आजूबाजूला तेवती ही निरांजने ॥ ४ ॥

उदबत्तीचा सुवास सुटला
भक्तजनांचा आनंद उसळूनी आला ॥ ५ ॥

बोल उठले तूच सद्‌गुरु
तूच तारू हाच आमचा निर्धारू ॥ ६ ॥

घेऊनी हाती पंचारती बंधूभगिनी ओवाळीती
सद्‌गुरू साईनाथ हासती नयनात चमके प्रिती ॥ ७ ॥

तेज ओसंडे दाही दिशा
सर्वांच्या परिपूर्ण झाल्या मनीषा ॥ ८ ॥

स्वत्वच अर्पूनी रमूनी गेलो साई भजनी
रंगूनी गेले सारे गुरुभजनी गुरु पूजनी ॥ ९ ॥

पाहूनी डोळा हा गोड सोहळा
सुमनच्या जिवाचे भान बाई हरपले ॥ १० ॥

भेटले भेटले सद्‌गुरु भेटले
मला सद्‌गुरु साईनाथ भेटले ॥ ११ ॥

दिधला मंत्र शांती सबूरी
ताप पाप पळाले दूरी ॥ १२ ॥

—डॉ. सौ. सुमती खानविलकर
लोणावळा

# श्री गुरुदक्षिणा

[ संसाररूपी महासागरातल्या अनेक भोवऱ्यातून श्री साई माऊलीच्या] दयेने जगत आलेल्या ह्या साई कन्येची श्री परम पिता साईनाथांच्या चरणी कृतज्ञतेने वाहिलेली ही गुरुदक्षिणा. ]

साई होऊ कशी उतराई ।
साई होऊ कशी उतराई ॥ धृ० ॥

किती आठवू मदत अनंता ।
ऋणी तुझी मी असे समर्था ।
तुला तुझे मी कैसे देऊ ।
साई माय मी तुझे लेकरू । साई ॥ १ ॥

कूर्म दृष्टीचा पाजुनी पान्हा ।
तृप्त केलीस तू मनोकामना ।
पाठीशी माझी माय माऊली ।
सर्व सुखाची तूच साऊली । साई ॥ २ ॥

श्रद्धा, सबूरीने प्रेम करावे ।
माणुसकीने जीवन जगावे ।
कृतज्ञतेने सेवा व्हावी ।
हीच दक्षिणा सद्गुरु पायी । साई ॥ ३ ॥

—सौ. शांता अंबाजीराव सरोदे
उद्देगल बि. नं. ६ खोली नं. १०
एन्. सी. केळकर रोड, दादर मुंबई २८

# गुरुगीत

गुरु चरणांची जडली प्रीति ।
गुरुवीण नाही कोणी जगति ॥

गुरु सोबती गुरु सांगाती ।
उभा रक्षणा मागे पुढती ॥

गुरु महिम्याची ख्याति जगति ।
जन कल्याणा सदैव झटती ॥

रागलोभ ना त्यांच्या पाशी ।
सदैव वरिले क्षमा शांतीसी ॥

गुरुवीण नाही त्राता जगति ।
याचीच येईल सर्वां प्रचीति ॥

सदैव शिष्या गुरु सांभाळिती ।
गुरुवीण नाही प्रगति जगति ॥

साई सारखा गुरु लाभता ।
काय उणेहो त्याच्या भक्ता ॥

जन्म देऊनी कृतार्थ माता ।
परि गुरु हो जीवन दाता ॥

—श्रीमती श्री. शहाणे
लक्ष्मी निवास, गडकरीपथ, डोंबिवली

# गुरुपौर्णिमा

आला ! आला !!
समीप आला ! गुरुभक्तांचा सण हा न्यारा
गुरुपुत्रांना भासे तो दसरा दिवाळीहूनी न्यारा
गुरुकृपेची साऊली देते ही आमुची माऊली साई
जनहो या विण नच दुजे आम्हा काही
गुरुपौर्णिमेची साधुनी सुमंगल पर्वणी

शिर्डीक्षेत्री जमली साई देवा बाळे तुझी अज्ञानी
घ्या ना बाबा ! मानस पुजा ह्या भक्त जनांची
पवित्र मानुनी घ्यावी वेडीवाकुडी सेवा आमुची
काही चुकल्यास क्षमा असावी ह्या तुझ्या अज्ञ लेकरांना
नित्य निरंतर वेड तुझेच लागो आमुच्या तन मना
काय उणे तुम्हा बेल-फुले हार तुळशीपत्र !

प्रित तुम्हा भारी निष्कपट सुमनांची अन् श्रद्धेची मला
गुरुपुजनाच्या समई अर्पीते ही शशि सर्वस्व तुला
अन् भिक एक मागते ती द्यावी साईदेवा मला
तुझीया चरणाविण नको अंतरू कधीही मजला
जन्मोजन्मी हेच मागणे असे माझे साईनाथ देवा तुजला

—सौ. शशिकला रेवणकर
कुंटोली, अंबरनाथ

# बडी दयालु मशिद माई

बडी दयालु मशिद माई
केहे गए है बाबा साई
यहा भक्ति से जो भी आए
आत्मा की सुख शांती पाए
हर चिंता से मुक्त करे ऐसी ये मशिद माई
केहे गए है बाबा साई
संजीवनी है उदि धुनी की
ज्योली जली थी यहा पानी की
सफल है जीवन होता उसका
जिसने उदि लगाई केहे गए है बाबा साई

—श्री. जयवंत कुलकर्णी
कुलकर्णी कुटीर, १०, प्रार्थना समाज रोड,
विलेपार्ले ( पूर्व ), मुंबई ५७

# साई

साई साई नामस्मरण
दुःखाचे होई हरण
साई घेता नाम मुखी
जीव होतो सदा सुखी
साई तुझी अगाध लीला
इच्छा जाई पूर्णत्वाला
साई नाम ज्याचे ओठी
धडपडेल कशाला सुखासाठी
साई साई गाता गाता
नामस्मरणाची पूर्ण सांगाता
साई रूप सौम्य प्रशांत
देखता होई मन शांत

—सौ. वंदना लाळगे
द्वारा पी. एन. नाचण, नाचण चाळ,
मु. पो. नेरळ, ता. कर्जत, जि. रायगड

# एक पथिक

आजवरच्या प्रवासात तूच माझा साथी होतास,
हाती दिवा घेऊन पुढे-पुढे चालत होतास !
वाटेत होते काटेकुटे,
चालता चालता उर फाटे,
मन नैराश्याने दाटे,
हृदय कणाकणाने तुटे !
तेव्हा तूच माझ्या जखमा बांधल्या होत्यास,
आणि हळुवार मनावर फुंकर घातली होतीस !
तुझ्या त्या स्निग्ध हास्यात,
आशेचा किरण लुकलुकला मनात,
त्याच प्रकाशात दिसली मला
चांदवा शिंपलेली पाऊलवाट !
आनंदाश्रुंनी भरले डोळे, काय झाले मला न कळे !
शिरावरी त्यांचा हात, मी डुंबले स्वर्गसुखात !
गुंग मी त्या समाधीत असता,
अंर्तधान पावले 'साई' पहाता पहाता !!

—अनामिका

# प्रार्थना

साई नाम मुखी साई ध्यान डोळा
छंद तुझा आगळा मज लागला
चिंता भय दुःख दूर दूर पळाली
साई गरिबांचा वाली जवळी केला
कठोर या जगी इप्सित साध्य न होई
म्हणून तुझ्या पायी माथा ठेवियेला
तुझे चरण न सोडी दीनानाथा साई
लवकर दर्शन देई हीच आस मनी

-श्री. मुरलीधर घोलप
६५३ सहकार नगर नं. २ चेंबूर, मुंबई-७१

# साई स्तवन

ज्ञानेशाची ती आळंदी
देहुला तुकयाची समाधी
पैठणी संत श्री एकनाथ
शिरडीचे सद्‌गुरु साईनाथ
करू या आपण प्रणिपात ॥ धृ ॥
धन्य धन्य ती शिरडी नगरी
धन्य द्वारकामाई
मंदिरी बसले संत श्रेष्ठ श्री
सद्‌गुरु बाबासाई
तव स्पर्शाने पूनित झाली ही
ही शिरडी निमिषात ॥ १ ॥
भक्तीची ही ज्योत तेवते
अमुच्या नित्य मनात
कीर्तीचा तव सुगंध पसरे
अवघा त्रिभुवनात
तव मायेचा सदा फिरावा
पाठीवरुनी हात ॥ २ ॥
भाविकजन हे येऊनी शिरडी
विनम्र चरणी होती
दुःखे त्यांची सर्वही हरती
घेता उदी हाती !
तव श्रध्देचा नितांत रहावा
आदर हा हृदयात ॥ ३ ॥

—श्री. चंद्रकांत नाचणे
१३ रजत धवलगिरी शहाजी राजे मार्ग,
विलेपार्ले मुंबई ४०००५७

★

# साई शिर्डी जाऊ या

साईची कीर्ति स्मरुनी
साई नामे धावा करुनी
साईचे चरण धरुनी
साई गुणगाण गाऊ या
साई आशिर्वाद घेऊ या
साई शिर्डी जाऊ या... ॥ १ ॥
साईच्या दिव्य मंदीरी जाऊनी
साई महिमा वाखुनी
साई गौरव करूनी
साई गुणगान गाऊ या
साई आशिर्वाद घेऊ या
साई शिर्डी जाऊ या.... ॥ २ ॥
साईप्रेमाचा भूका म्हणोनी
साई भूपाळी गाऊनी
साईची आरती करूनी
साई गुणगान गाऊ या
साई आशिर्वाद घेऊ या
साई शिर्डी जाऊ या.... ॥ ३ ॥
साईस एक मालक समजुनी
साईस आपुला पालक म्हणोनी
साईस अंतःकरणी ठेऊनी
साई गुणगान गाऊ या
साई आशिर्वाद घेऊ या
साई शिर्डी जाऊ या... ॥ ४ ॥

—श्री. ग. शां. बडगुजर
मोगलाई, भाटेचाळ
धुळे–४२४००१

# शिरडी हा स्वर्गच या भूवरी

श्री नाथांचा वास निरंतर, चराचरी अंतरी
शिरडी हा स्वर्गच या भूवरी...

श्रीनाथांच्या पदस्पर्शातून
पुनीत झाले अवघे जीवन
सत्संगातून उदया आली
इथे द्वारकापुरी....

प्रासादातून रम्य पथातून
तपोवनी या कणाकणातून
साई कृपेची प्रभा पसरली
उजळीत ही नगरी...

भाव भक्तीची फुले उमलती
वात सुगंधित इथे वाहती
झुळ झुळ झुळ वाहे वेद सनातन
स्वर्गातून नगरी....

श्रीनाथांचे पावन मंदीर
भाव भक्तीचा स्वर्ग घरेवर
निराधार आधार मनाला
गोवर्धन गिरीधारी....

☆ ☆ ☆

# शिरडी साईधाम

मनोरथांची करी पूर्णता, देई पूर्ण विराम
शिरडी साईधाम....

श्रीकृष्णाची जशी द्वारका, श्रीरामाची पंचवटी
उभा ठाकला वीटेवरती, श्याम सावळा जगजेठी
साईनाथहि तसे जाहले, भूषण शिरडी धाम...

पंढरपूर हे नवे वसविले, शिरडीचे गोकुळ
भक्त जनांच्या गोपगड्यांचे, उभे राहिले बळ
इथे घडविला पुण्यभूमितून, कर्म योग निष्काम...

साईनाथ परमेश्वर इथला, इथला प्राण विसावा
कणाकणातून भरून राहिला, भक्तीतून गोडवा
भक्त जनांच्या मनी नांदतो, साई तोच श्रीराम...

—श्री. म. कृ. विचारे
१५ बी, भक्ति-सुधा, वाकोला,
सांताक्रुझ (पूर्व) मुंबई.

★

# तुझी प्रार्थना—माझी पुण्यकमाई

ईश्वर अल्ला म्हणू कशाला नाम गोड श्रीसाई
शिरडी क्षेत्रातली भलाई तारी जीवन खाई...॥ धृ० ॥

श्री गुरुराया पायी तुझिया
तिन्ही जगांची योगी माया
धर माझ्यावर निरंत छाया
तुझ्याविना मज नाही कोणी रे तूच बाप आई...॥ १ ॥

मी तर पामर पतीत पापी
वरदहस्त तव करी प्रतापी
लोह मीच तू परीसरुपी
तुझ्या भक्तिची शक्ती लंघण्या मेरु अथवा राई...॥ २ ॥

स्थिर मन माझे तुझ्याच्च ठायी
सर्व सुखी मी तुझ्या आश्रयी
मला न मुक्ती दुज्या उपायी
तुझी प्रार्थना तुझी आरती माझी पुण्यकमाई....॥ ३ ॥

—श्री. दत्ता कदम
५७८ चव्हाण अपार्टमेंटस
जंगली महाराज रोड, पुणे४

236

साईभक्तांना अमूल्य नजराणा

साईबाबांचे सानिध्यात असलेले सध्याचे एकमेव
श्रीस्वामी साई शरणानंद लिखित

अमूल्य ग्रंथ

# 'श्री साईबाबा'

शिरडीच्या साईबाबांचे ऐतिहासिक चरीत्र

मूळ किंमत
रु. ६०/-

: प्रकाशक :

दिनपुष्प प्रकाशन

कृष्णा १२ बी
डॉ. भालेराव मार्ग,
गिरगांव : मुं. नं. ४००००४

# शिरडी–वृत्त माहे मे १९८२

या महिन्यात शिरडीस श्रीसाईबाबांचे दर्शनासाठी बाहेरगावची भक्तमंडळी फार मोठ्या बहुसंख्येने आली होती. काही कलाकारांनी श्रींच्या पुढे हजेरी दिली ती खालील प्रमाणे—

**कीर्तन** १) एकादशी व महत्वाचे दिवशी संस्थानतर्फे कीर्तने झाली.
२) ह. भ. प. श्री. दत्तात्रय दामोदर रासने शिर्डी.

**प्रवचन** १) ह. भ. प. लक्ष्मण बुवा वाकचौरे शिर्डी.
२) ह. भ. प. मुरलीधर पाटील देशमुख. शिर्डी.

**भजन, गायन, वादन, वगैरे** १) साईनाथ बेंजामीन प्रभादेवी. २) डॉ. सुशांत भट्टाचार्य, हैद्राबाद. ३) श्री. सुधाकर कामतेकर, वडाळा. ४) सौ. मधूवंती मिराशी, मुंबई. ५) श्री. अमरनाथ फक्ते, इलाहाबाद. ६) श्री. कमलाकर महाराज चोपडेकर, पैठण. ७) सौ. कौशाबाई चिमणलाल चोपडा, शिर्डी. ८) श्री. अरविंद वासुदेव केळकर, पोयनाड, अलिबाग. ९) श्री. भारत भजन पार्टी, उंगोल. १०) श्री. आनंद कुमार पुरी, मुंबई. ११) श्री. पुरणलाल व्यास ॲण्ड पार्टी, हैद्राबाद. १२) श्री. हरेंद्र शुक्ल, बडोदा. १३) श्री. रामकृष्णा अरुणनेरी, चंगम, बेल्लोर. १४) सौ. ज्योती ए. मनुजा ॲण्ड पार्टी–खार. १५) श्री. ए. एम. मनुजा १६) श्री. चाँद ए. मनुजा, १७) श्री. महेश ए. मनुजा, १८) कु. मीना ए. मनुजा १९) श्री. संजु भंगनानी. २०) श्री. वसंतराव दत्तात्रय वाळूंजकर, डोंबीवली. २१) श्री. के. एम. शिढोले, ग्वालियर. २२) श्री. कमलेश माधू, दिल्ली. २३) श्री. देवासकर मुंबई. २४) श्री. वसंतराव दादाराव पवार, शिर्डी. २५) श्री. महिला मंडळ, उरनपान. २६) श्रीमती वेदावती एम. गोपाल, हैद्राबाद. २७) स्मिता बाबरे मुंबई. २८) व्ही. विजय कुमार नारायण पेठकर, नारायणपेठ. २९) श्री. मधूकर आर. भट. ३०) रिमांड होम बॅण्डपथक, श्रीरामपूर. ३१) श्री. एस. व्ही. शर्मा, नागपूर. ३२) श्री. एम. सुब्बाराव, येल्लूर.

**हवा पाणी** – शिरडी येथील हवापाणी उत्तम असून रोगराई काही नाही. पहाटे हवा आल्हादकारक असते.

# अपंग शस्त्रक्रिया शिबीर

श्री साईबाबा संस्थान शिरडी व जिल्हा परिषद अहमदनगर यांच्या संयुक्त सहकार्याने दि. ८–५–८२ व दि. ९–५–८२ या दोन दिवशी श्री साईनाथ रुग्णालय शिरडी येथे अपंग शस्त्रक्रिया शिबीर आयोजित करण्यात आले होते. या शिबीरासाठी नागपूरचे ख्यातनाम अस्थिव्यंग शल्य विशारद डॉ. मारवाह आणि त्याचे सहकारी आले होते.

या शिबीरामध्ये ५०० रूग्णांची मोफत तपासणी करण्यात आली. एकूण ६५ रूग्णांच्या अस्थिव्यंगावर शस्त्रक्रिया करण्यात आल्या आणि १३० रूग्णांना कॅलीपर्स बूटस् वगैरे साधने मोफत पुरविण्याचे ठरले आहे.

शस्त्रक्रिया झालेल्या रूग्णांना तसेच त्यांच्या बरोबरच्या नातेवाईकांना संस्थान तर्फे मोफत जेवणाची व चहाची सोय करण्यात आली होती.

सदर शिबीराचे यशस्वी संयोजन संस्थानचे ऑन. अस्थिव्यंग तज्ञ डॉ. याडकीकर, संस्थान रूग्णालयाचे निवासी वैद्यकीय अधिकारी डॉ. प्रबोध जोशी, वैद्यकीय अधिकारी डॉ. पी. एस. देशपांडे, डॉ. ठोळे तसेच राहाता प्राथमिक आरोग्यकेन्द्राचे डॉ. गुंजाळ व श्रीरामपूर येथील अस्थिव्यंग तज्ञ डॉ. आगाशे यांनी केले.

## नांदासौख्यभरे

● मुंबईचे साईभक्त आणि मशहूर गायक श्री. श्रीराम सातर्डेकर यांचे ज्येष्ठ चिरंजीव श्री. प्रदीप यांचा विवाह चि. सौ. कां. इंद्रायणी (कै. विठ्ठल रामचंद्र राणे यांची कन्या) इजबरोबर गुरुवार ता. १७ जून ८२ रोजी बसरमल खुशालदास नसरपुरी हॉल माहिम येथे थाटात साजरा झाला. वधूवराना शुभाशिष देण्यासाठी विविध क्षेत्रातली मंडळी हजर होती.

आम्ही दांपत्याला भावी जीवनात सुयश चिंतीतो.